सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## ग्रामविकास व पंचायत राज विभाग

# राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण



# महा आवास

## त्रैमासिक

@MAHAAWAAS www.mahaawaas.com

एप्रिल ते जून २०२३




प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत दोन दिवसीय पश्चिम भारत प्रादेशिक कार्यशाळे प्रसंगी मा.महानिदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार श्री.गया प्रसाद यांचे स्वागत करतांना मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले




प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत दोन दिवसीय पश्चिम भारत प्रादेशिक कार्यशाळे प्रसंगी मा. सचिव, ग्रामीण विकास, राजस्थान श्रीमती मंजू राजपाल यांचे स्वागत करतांना मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले




प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत दोन दिवसीय पश्चिम भारत प्रादेशिक कार्यशाळे प्रसंगी मा.उपसचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार श्री.शक्तीकांत सिंह यांचे स्वागत करतांना मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले




प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत दोन दिवसीय पश्चिम भारत प्रादेशिक कार्यशाळे प्रसंगी सह सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार श्री.अजय मोर यांचे स्वागत करतांना मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# ग्रामविकास व पंचायत राज विभाग

## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

## महा आवास

| | |
|---|---|
| मार्गदर्शक | एकनाथ डवले, भा.प्र.से.<br>प्रधान सचिव,<br>ग्राम विकास व पंचायत राज विभाग |
| मुख्य संपादक | डॉ. राजाराम दिघे,<br>संचालक,<br>राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण |
| प्रबंध संपादक | मंजिरी टकले, उपसंचालक<br>नीलेश काळे, उपसंचालक<br>अपर्णा पाटणे, सहा. संचालक (लेखा) |
| कार्यकारी संपादक | दिनेश मोवळे, प्रशिक्षण समन्वयक |
| सहयोगी संपादक | डॉ. संघरत्न सोनवणे<br>राम आघाव<br>परमेश्वर शेलार<br>माधुरी चौधरी |
| मुख्यपृष्ठ मांडणी व सजावट | दिनेश मोवळे<br>प्रशिक्षण समन्वयक<br>(माहिती, शिक्षण व संवाद) |
| संपादकीय पत्ता | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-<br>ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय<br>४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन,<br>सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ |
| संकेत स्थळ | www.pmayg.nic.in<br>www.mahaawaas.com |
| ईमेल | directoriayruralhousing@gmail.com |
| दूरध्वनी क्रमांक | ०२२ - २७५६१८२४ |

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संपादकीय | १ |
| २ | अमृत महा आवास अभियान २०२२-२३ फलश्रुती | ३ |
| ३ | विविध उपक्रमांचा मागोवा<br>क्षमता बांधणी उपक्रम | ८ |
| | संनियंत्रण व मूल्यमापन उपक्रम | १० |
| | माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम | १४ |
| | समन्वय उपक्रम | १८ |
| | केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधित पॉलिसी इनपुट | २२ |
| ४ | ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा संचित प्रगती अहवाल<br>प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण | २३ |
| | रमाई आवास योजना | २४ |
| | शबरी आवास योजना | २५ |
| | पारधी आवास योजना | २६ |
| | आदिम आवास योजना | २७ |
| | यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना | २७ |
| ५ | ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम/<br>यशोगाथा | २८ |
| ६ | फोटो गॅलरी | ३४ |
| ७ | मिडिया कवरेज | ३५ |



वर्ष ३ रे । अंक १२ वा । एप्रिल ते जून २०२३


महा आवास हेल्पलाईन क्रमांक - १८०० २२ ०१९



**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण**

महा आवास त्रैमासिकाच्या माहे एप्रिल ते जून २०२३ या अंकाच्या माध्यमातून आपणाशी संवाद साधताना मला आनंद होत आहे. या अंकामध्ये मागील तीन महिन्यामध्ये झालेल्या घडामोडींचा धांडोळा घेण्यात आलेला असून त्याचबरोबर माहे जून पर्यंतची सर्व योजनांची प्रगती, विभागनिहाय यशोगाथा, बैठका व नावीन्यपुर्ण उपक्रम यांचा सविस्तर आढावा या अंकामध्ये घेण्यात आला आहे. तसेच दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ ते ०५ जून, २०२३ या दरम्यान अमृत महा आवास अभियान राबविण्यात आले. महा आवास १ व २ च्या तुलनेत या अभियानात अनेक नव्या उपक्रमांना चालना देण्यात आपणास यश मिळाले आहे.

महा आवास अभियान एक व दोन व अमृत महा आवास अभियान कालावधी एकत्रीत केला तर जवळपास २ वर्ष ६ महिने पेक्षा अधिक दिवस झाले आहेत. दोन्ही अभियानामध्ये अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. यामध्ये पहिल्या अभियानात कोरोना जागतीक महामारी तर दुसऱ्या अभियान काळामध्ये ग्रामपंचायत निवडणुक आचारसंहितेमुळे अभियानाच्या गतीला मर्यादा आल्याचे दिसून येत होते. तर अमृत महा आवास अभियानात भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून मंजूरी देणे, जॉब कार्ड, मिक्स ग्रामपंचायती, इ तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागले. परंतु राज्यातील विविध भागधारकांच्या सक्रिय सहभागामुळे तीनही अभियान यशस्वी करण्यात आपणास यश आले. राज्यातील विविध स्तरावरील अधिकारी/ पदाधिकारी यांनी अभियानात आपला सक्रिय सहभाग नोंदविला. राज्याचे मा. मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा. मंत्री ग्रामविकास व पंचायत राज, जिल्हयांचे मा. पालकमंत्री तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती यांचे अध्यक्ष, सभापती व सदस्य यांचाही अभियानातील सक्रिय सहभाग विविध प्रिंट मिडिया व इलेक्ट्रॉनिक मिडिया अशा माध्यमातून दिसून आला.

महा आवास अभियान टप्पा १ व २ प्रमाणेच अमृत महाआवास अभियानामध्ये अनेकविध नाविन्यपुर्ण उपक्रमांची अंमलबजावणी केली. याचा फायदा लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यामध्ये होत आहे. अमृत महा आवास अभियानामधील राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे यश पुढील प्रमाणे सांगता येईल. पंडीत दिनदयाळ उपाध्याय जाग खरेदी अर्थसहाय्य योजना, मोफत शासकीय जागा उपलब्ध करून देणे, अतिक्रमण नियमानुकूल करणे, इतर मार्ग या विविध योजनांच्या माध्यमातून २०,०२३ लाभार्थ्यांना घरकुलासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली, तसेच भूमिहीन लाभार्थ्यांच्या जागेची समस्या सोडविण्याठी १,१४७ बहुमजली इमारती, २७९ गृहसंकूले, १२ अपार्टमेंट व ८,९७२ लँड बँकची निर्मिती करण्यात आली आहे. केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध आवास योजनांतील

२,६९,८५५ घरकुलांना मंजूरी, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधील मंजूर २,२१,९४६ घरकुलांना पहिल्या हप्त्यांचे, २,७२,०१९ दुसऱ्या हप्त्याचे, २,४९,३९७ तिसऱ्या हप्त्याचे वितरण तर राज्य योजनेतील १,०३,३३२ घरकुलांना पहिल्या हप्त्यांचे, ९२,७१२ दुसऱ्या हप्त्याचे, ८५,३७४ तिसऱ्या हप्त्याचे वितरण करण्यात आले. यामुळे योजनांच्या अंमलबजावणीमध्ये गतिमानता येऊन ४,२२,२६६ लाभार्थ्यांनी आपल्या पक्क्या घरात प्रवेश केला आहे.

लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम साहित्य अल्पदरात व नजीकच्या ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी २०४ घरकुल मार्ट व वाळूची समस्या सोडविण्यासाठी ८६६ ठिकाणी सँडबँकची निर्मिती करण्यात आली आहे. ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाच्या माध्यमातून ५,४६३ गवंड्यांना प्रशिक्षण देण्यात आले. इंदिरा आवास योजनेतील ४०३ घरकुले पूर्ण करणेत आली आहे. प्रलंबीत घरकुले पुर्ण करणेसाठी जनसुनावणी, लोक अदालत, पोलीसांचा वापर इ साधनांचा आपण उपयोग केल्यामुळे ही घरकुले पुर्ण होण्यास मदत मिळाली आहे. ४०० ग्रामपंचायतीमध्ये सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया पुर्ण करण्यात आली. तथापी Area Officer App चा वापर वाढविणे गरजेचे वाटते. लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी इतर शासकीय योजनांच्या कृतीसंगमातून योजनांचा लाभ देण्यात आला. यामध्ये स्वच्छ भारत मिशन मधून ३,३५,५९५ लाभार्थ्यांना शौचालये, जल जीवन मधून २,८७,१७५ लाभार्थ्यांना नळाद्वारे पाणीपुरवठा, ३,०६,८६५ लाभार्थ्यांना उज्वला गॅस, ३,२२,१४७ लाभार्थ्यांना सौभाग्य योजनेतून वीज कनेक्शन, ९३,३०८ लाभार्थ्यांना उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध करून देण्यासाठी बचत गटांमध्ये समावेश अशा उपाय योजना करण्यात आल्या आहेत.

याबरोबरच मा. मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज यांच्या उपस्थितीत Rotary Club, College of Engineering, Pune यांच्या समवेत पार्टनरशीप घोषीत करण्यात आली या महाविद्यालयाच्या ३० विद्यार्थ्यांना राज्यातील २७ जिल्हयांसोबत इंटरशीप व्दारे जिल्हा यंत्रणांशी जोडण्यात आले.

मा. मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज, विविध जिल्ह्यातील मा. पालकमंत्री, पदाधिकारी, अधिकारी, केंद्रीय अधिकारी यांचा दौरा, घरकुल भेटी याचेही सविस्तर विवेचन सदर अंकामध्ये करण्यात आले आहे. तसेच राज्य व्यवस्थापन कक्षामार्फत योजनांना गतिमानता देण्यासाठी राबविण्यात आलेल्या मोहिमांचे वृत्तांकन सदर अंकामध्ये करण्यात आले असून मागील तीन महिन्यांचा योजनांनिहाय प्रगती अहवालाचाही समावेश करण्यात आला आहे. सहा विभागाच्या यशोगाथा यामध्ये नागपूर विभागातील कळमेश्वर, अमरावती विभागातील यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी, औरंगाबाद विभागातील हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव, नाशिक विभागातील अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर, पुणे विभागातील सातारा जिल्ह्यातील पाटण आणि कोंकण विभागातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यातील यशोगाथा या वाचनीय आहेत.

अमृत महा आवास अभियानातील ग्रामपंचायत, तालुका, जिल्हा व विभागस्तरावरील पुरस्काराचे वितरण वेळेत पुर्ण होईल ही अपेक्षा. मागील अंकाप्रमाणे हा अंकही आपणास नक्कीच आवडेल. अनेक शुभेच्छांसह!!

**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त

# अमृत महा आवास अभियान २०२२-२३ फलश्रुती

राज्यात राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना अशा विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविण्यात येत असून त्यांना पूरक पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, अतिक्रमण नियमानुकूल करण्याची योजना अशा योजनाही राबविण्यात येत आहेत.

"सर्वांसाठी घरे-२०२४" या शासनाच्या धोरणांतर्गत विविध उपक्रम राबवून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता आणणे या हेतूने भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्यात **दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनापासून दिनांक ०५ जून, २०२३ या कालावधीत "अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** राबविण्यात आले. या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ दिनांक २४ नोव्हेंबर २०२२ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.एकनाथ शिंदे यांचे शुभहस्ते व मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री. देवेंद्र फडणवीस, मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, ॲड. राहुल नार्वेकर, मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री. गिरीष महाजन, मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री. राजेश कुमार व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांचे प्रमुख उपस्थितीत यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे संपन्न झाला.

या प्रसंगी सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, महा आवास अभियान २०२०-२१ चे सर्व राज्यस्तरीय पुरस्कार विजेते, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयातील व ग्राम विकास विभागातील अधिकारी/कर्मचारी, इ. उपस्थित होते.

**"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** अंतर्गत दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ ते दिनांक ०५ जून, २०२३ या कालावधीत राज्यात विविध उपक्रम राबवून सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता आणण्यात आली. या अभियानात पुढील उपक्रमांवर विशेष भर देण्यात आला असून त्याची फलश्रुती पुढील प्रमाणे आहे.

### i.भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे

ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत गरजू, पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यासाठी **पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना,** शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करण्याची योजना, ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजना व इतर मार्ग – उदा. बक्षीसपत्र, भाडेपट्टा, इ. प्रभावीपणे राबवून **२३,६८० भूमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता** केली आहे. तसेच जागांची कमतरता व जागांच्या किमती यांचा विचार करून कमी जागेत जास्त लाभार्थी सामावण्यासाठी राज्यात **प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये** प्रत्येकी किमान एक याप्रमाणे **१,१५२ बहुमजली इमारती, २७९ गृहसंकुले व १२ हाऊसिंग अपार्टमेंट,** इ. ची उभारणी केली आहे.

त्याचप्रमाणे सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर **विविध मार्गांनी उपलब्ध होणाऱ्या जागांची** ८,९७२ **'लॅण्ड बँक'** तयार केल्या आहेत.






### ii. घरकुलांना उद्दिष्टांप्रमाणे १०० टक्के मंजूरी देणे

केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत जिल्ह्यांना वितरीत करण्यात आलेल्या घरकुल उद्दिष्टांप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत १,६१,२१८ व राज्य पुरस्कृत योजना अंतर्गत १,०८,६२७ अशा **एकुण २,६९,८५५ घरकुलांना मंजूरी** देण्यात आली आहे. ग्रामीण गृहनिर्माण कामात लाभार्थ्यांच्या सक्रीय सहभागासाठी लाभार्थ्यांना **घरकुल मंजूरीचे पत्र** त्वरीत वितरीत करणे, घरकुलाचे काम तात्काळ सुरु करणेबाबत सूचना देणे, घरकुल बांधकामाबाबत तांत्रिक मार्गदर्शन करणे व भूमिपूजन कार्यक्रम करुन **घरकुलाचे बांधकाम सुरु करणे**, इ. उपक्रम राबविण्यात आले.



### iii. मंजूर घरकुलांना सर्व हप्ते वेळेत वितरीत करणे

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत मंजुर घरकुलांना २,२१,९४६ लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण, २,७२,०१९ लाभार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचे वितरण व २,४९,३९७ लाभार्थ्यांना तीसऱ्या हप्त्याचे वितरण करण्यात आले. त्याचप्रमाणे राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत मंजुर घरकुलांना १,०३,३३२ लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण, ९२,७७२ लाभार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचे वितरण व ८५,३७४ लाभार्थ्यांना तीसऱ्या हप्त्याचे वितरण करण्यात आले. सर्व लाभार्थ्यांना घरकुलांच्या भौतिक प्रगतीनुसार हप्ते विनाविलंब वितरीत करण्यात आले. याकरीता स्थानिक स्तरावर **हप्ते वितरण कार्यक्रमाचे आयोजित केले**. तसेच गरजेप्रमाणे इच्छुक लाभार्थ्यांना वित्तीय संस्थांकडून **गृहकर्ज मिळवून देण्यासाठी मदत** करण्यात आली.



### iv. सर्व मंजूर घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे

केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत सर्व मंजूर घरकुलांचे काम भौतिकदृष्ट्या पूर्ण करण्याकरीता लाभार्थ्यांच्या सक्रीय सहभागासाठी त्यांच्या बैठका/मेळावे घेतले, सरपंच, ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी घरकुलांना वेळोवळी भेटी दिल्या. त्याचप्रमाणे मंजूर केलेली सर्व घरकुले किमान कालावधीत पूर्ण करण्यासाठी राज्यात महिला स्वयंसहायता गट/ ग्राम संघ/ प्रभाग संघ/ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/ शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थाद्वारे **२०४ घरकुल मार्ट** सुरु करुन त्याद्वारे घरकुलाचे बांधकाम साहित्य जसे – दगड, विटा, वाळू, सिमेंट, दारे, खिडक्या, छताचे साहित्य, इ. विक्रीसाठी उपलब्ध केले. तसेच सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता वाळू उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक जिल्हा परिषद गटात किमान एक याप्रमाणे ८६६ **'सॅण्ड बँक'** ची निर्मिती केली.

अभियान कालावधीत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ३,३५,५७५ व सर्व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत ८६,६९१ अशी **एकुण ४,२२,२६६ घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण** करण्यात आली आहे. तसेच जवळ जवळ ४,०४,४७९ घरकुलांचे काम प्रगतीपथावर असून येत्या कालावधीत ही घरकुले पूर्ण होतील.



### v. प्रलंबित घरकुले (Delayed Houses) पूर्ण करणे

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुलांना पहिला हप्ता प्रदान केल्यापासून १२ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेली, मात्र अद्यापपर्यंत अपूर्ण असलेली प्रलंबित घरकुले (Delayed Houses) प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी प्रलंबित घरकुलांच्या यादीनुसार घरकुले प्रलंबित राहण्यामागची कारणे शोधून त्या **कारणांचे विश्लेषण करुन त्यावर उपाययोजना करून १,१५,७० घरकुले पूर्ण करण्यात आली**. याकामी गरजेप्रमाणे तालुका कायदेविषयक सहाय्य व सल्ला समितीच्या सहाय्याने **'लोक अदालत'** वा इतर मार्गाने लाभार्थ्यांना

घरकुल पूर्ण करण्यासाठी प्रवृत्त केले. तसेच पूर्ण होऊ न शकणारी प्रलंबित घरकुले प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या मार्गदर्शक सूचनांनुसार Refund करुन Remand केली. तसेच यापुढे प्रलंबित घरकुलांच्या यादीमध्ये नविन घरकुलांचा समावेश होणार नाही या दृष्टीने नियोजन करण्यात येत आहे.

### vi. ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ३३,४०७ ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट प्रशिक्षण देणाऱ्या संस्था (Training Provider) यांच्याशी समन्वय ठेवून पूर्ण करुन कुशल गवंड्यांची निर्मिती करण्यात आली. **तसेच २९,०६९ गवंड्यांचे मुल्यांकन (Assessment) त्वरीत पूर्ण करुन** सदरची माहिती आवास सॉफ्टवर अद्ययावत केली. प्रशिक्षित ग्रामीण गवंडी व ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर उपलब्ध गवंडी यांची ग्रामपंचायतनिहाय यादी तयार करुन त्यांचे पॅनेल बनवून या **पॅनेलमधील गवंड्यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील घरकुलांच्या बांधकामात सहभाग** घेण्यात येत आहे.

कुशल गवंड्यांच्या पॅनल मुळे ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता आली असून प्रशिक्षित गवंड्यांना रोजगाराचे साधन उपलब्ध झाले आहे.



### vii. इंदिरा आवास योजनेंतर्गत उर्वरीत सर्व घरकुले पूर्ण करणे व क्षेत्र अधिकारी ॲप वापरणे

इंदिरा आवास योजनेंतर्गत सन २०१४-१५ व त्यापूर्वी भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेल्या **२६,९४६ घरकुल लाभार्थ्यांना सिंगल पेज एन्ट्रीनुसार तात्काळ निधी वितरीत करून ५,०८४ घरकुले आर्थिकदृष्ट्या पूर्ण**



**केली असून २१,८६२ घरकुल लाभार्थ्यांना निधी वितरणाचे काम प्रगतीत आहे.** तसेच सन २०१५-१६ मध्ये १३,०७५ मंजूर घरकुलांच्या यादीनुसार घरकुले प्रलंबित राहण्यामागची कारणे शोधून **त्यावर उपाययोजना करून १,०६१ घरकुले भौतिक व आर्थिक दृष्ट्या पूर्ण केली असून १२,०१४ घरकुलांचे काम प्रगतीत आहे.** तसेच ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी **प्रधानंत्री आवास योजना-ग्रामीण ची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी क्षेत्र अधिकारी ॲप** (Area Officer Aap) ची निर्मिती केली असून या ॲपचा वापर ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामाची पाहणीसाठी होत आहे.



### viii. सामाजिक लेखापरीक्षण वेळेत करणे

राज्यात ५,८०२ ग्रामपंचायतींमध्ये प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे **सामाजिक लेखापरीक्षण** करण्यात आले आहे. सामाजिक लेखापरीक्षण करतेवेळी लेखापरीक्षण मार्गदर्शक तत्वांचा अवलंब केला असून याकामी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, इतर पदाधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता व पालक अधिकारी यांचे सहकार्य घेण्यात आले.

### ix. शासकीय योजनांशी कृतीसंगम करणे

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांशी कृतीसंगम करून लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला. यामध्ये **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून** १,०९,७९,३८२ मनुष्य दिवस रोजगार, **स्वच्छ भारत**



मिशन-ग्रामीण मधून ३,४४,११७ शौचालये, जल जीवन मिशन मधून २,९५,०६८ घरांना नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, प्रधानमंत्री उज्ज्वला योजने मधून ३,१५,१२४ गॅस जोडणी, सौभाग्य योजने मधून ३,३०,५०४ विद्युत जोडणी, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशन मधून ९६,१२२ उपजिविकेचे साधन उपलब्ध, महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा) मधून ५,४९,६६८ उर्जेच्या बचतीची साधनं, इ. शासकीय योजनांचा लाभ कृती संगमातून घरकुल लाभार्थ्यांना देण्यात आला.

तसेच **दलित वस्ती सुधार योजने मधून ८५,६२०, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजने मधून ३६,०८३, जिल्हा परिषद सेस, पंचायत समिती सेस, ग्राम पंचायत सेस मधून १,२८,९४३ व सीएसआर निधी मधून २४,२२६** इ. च्या माध्यमातून लाभार्थ्यांची घरकुले, बहुमजली इमारती, गृहसंकुले, अपार्टमेंट यांना **मूलभूत नागरी सुविधा जसे जोडरस्ते, अंतर्गत रस्ते, ड्रेनेज सिस्टीम, पथदिवे**, इ. उपलब्ध करुन देण्यात आल्यात.



**x. नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणे :-**
**(Innovations / Best Practices)**

ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये गतिमानता व गुणवत्ता येण्यासाठी अभियान कालावधीत पुढीलप्रमाणे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले.

अ) ग्रामीण गृहनिर्माण लाभार्थ्यांच्या **बहुमजली इमारती, गृहसंकुले व हाऊसिंग अपार्टमेंट** यांच्या **२४९ सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या.**

**ब) वाळूला पर्याय** म्हणून क्रश सॅण्ड, सिमेंट ब्लॉक, फ्लाय ॲश ब्रिक्स, इंटर लॉकींग ब्रिक्स, हॉलो ब्रिक्स, इत्यादींचा वापर करून **४०,३१८ घरकुलांची निर्मिती करण्यात आली.**



क) किमान १०% घरकुल बांधकामासाठी **स्थानिक बांधकाम साहित्य, नवनवीन बांधकाम तंत्रज्ञान, किफायतशीर बांधकाम तंत्रज्ञान, नैसर्गिक आपत्ती रोधक तंत्रज्ञान**, इ. चा वापर करून **५७,३२२ घरकुलांची निर्मिती करण्यात आली.**

ड) किमान १०% घरकुल बांधकामामध्ये **फरशी/ लादी, रंगरंगोटी, किचन गार्डन/ परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टींग, सौरउर्जा साधने व नेट बिलींग, घरकुलांना रंगसंगती**, इ.चा वापर करून **७०,३८९ घरकुलांची निर्मिती करण्यात आली.**

इ) घरावर ग्रामीण गृहनिर्माण **योजनेचा लोगो, पती पत्नीचे नाव व ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवही मध्ये घरकुलाची नोंद** इ. बाबतची कार्यवाही ग्रामपंचायतस्तरावरून **२,७३,६८९ घरकुलांची करण्यात आली.**



**अभियानाच्या अंमलबजावणीसाठी क्षमता बांधणी कार्यक्रम**

**"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** प्रभावी अंमलबजावणी व भागधारकांच्या क्षमता बांधणीसाठी राज्यात अभियानाच्या राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा, विभागस्तरीय कार्यशाळा, जिल्हास्तरीय कार्यशाळा, तालुकास्तरीय कार्यशाळा व ग्रामस्तरीय कार्यशाळांचे आयोजित करून या कार्यशाळांमध्ये अभियानाबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे पुढील उपाययोजना करण्यात आल्या.

**ग्राम कृती गटाचे (Village Action Group) गठन**

**"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** ग्रामस्तरीय कार्यशाळेमध्ये प्रत्येक ग्रामपंचायती मध्ये 'ग्राम कृती गटाचे गठन' करण्यात आले. यामध्ये गावातील सरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील, शिक्षक, पोलीस, प्रभावी व्यक्ती, युवक/ युवती, इत्यादींचा समावेश प्राधान्याने करण्यात आला. या गटाने **"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** मध्ये गावस्तरावर केल्या जाणाऱ्या व करावयाच्या प्रत्यक्ष उपाय योजनांचा पाठपुरावा करुन अभियान १०० टक्के यशस्वी करण्यासाठी सर्वोत्तोपरी प्रयत्न केले.

## लाभार्थी मेळावे

गावोगावी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत लाभार्थ्यांचे मेळावे आयोजित करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम व दर्जाबाबत मार्गदर्शन व प्रोत्साहन देण्यात आले. तसेच लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्र वितरण, घरकुलाचे भूमिपूजन कार्यक्रम, घरकुलांचे हप्ते वितरण कार्यक्रम व गृहप्रवेश कार्यक्रम, इ. सारखे उपक्रम राबविणेत आलेत.



## बँक मेळावे

तालुकास्तरावर/ गावोगावी बँक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घरासाठी कर्ज घेवू इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांसाठी बँक मेळाव्याचे आयोजन करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी कर्ज उपलब्धतेसाठी प्रयत्न करण्यात आलेत.

तसेच या बँक मेळाव्यामंध्ये लाभार्थ्यांना गृह कर्ज व त्याकरीता आवश्यक कागद पत्रांबाबत मार्गदर्शन केले.

## महिला दिनी विशेष कार्यक्रमांचे आयोजन

राज्यात अमृत महा आवास अभियान २०२२-२३ या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व महिलांना सक्रीय सहभागी करण्यासाठी दिनांक ०८ मार्च, २०२३ रोजीच्या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला सक्षमीकरणाच्या हेतूने राज्यात विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये ग्रामीण आवास योजनांतर्गत घरकुले पूर्ण झालेल्या महिला लाभार्थ्यांचे एकत्रित गृहप्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. बचत गटात समाविष्ट नसलेल्या महिला घरकुल लाभार्थ्यांचा स्वंयसहायत्ता बचत गटात समावेश करण्यात आला. ग्रामीण आवास योजने अंतर्गत ज्या महिला लाभार्थ्यांनी अद्यापपर्यंत घरकुल बांधकाम सुरू केले नाही, अशा महिला लाभार्थ्यांचा एकत्रित भूमिपूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ग्रामीण गवंडी प्रशिक्षणांतर्गत इच्छुक महिलांचा समावेश करण्यात आला. तसेच गवंडी प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केलेल्या महिलांचा सत्कार करण्यात आला. अभियानाच्या यशस्वीतेसाठी उत्सफूर्तपणे सहभाग घेतलेल्या महिला/ लाभार्थी/ कर्मचारी/ अधिकारी/ पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. महिला लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी गृहकर्ज मिळवून देण्यासाठी बँक मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले.



पंचायत समिती आवारामध्ये उभारण्यात आलेल्या डेमो हाऊसेस मध्ये कॉप-शॉप सुरू करण्यात आले. यासाठी स्वंय सहायत्ता महिला बचत गटांना प्राधान्यक्रम देण्यात आला. विविध शासकीय योजनांशी कृती संगम करून महिला घरकुल लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यात आला. सर्व महिला लाभार्थ्यांच्या नावांची नोंद ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवही मध्ये घेण्यात आली. सर्वस्तरावर महिला मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले. अशा प्रकारचे उपक्रम जागतिक महिला दिनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात आले.

## विविध संस्थांशी भागीदारी व भागधारकांचे सहकार्य

राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांना चालना देण्यासाठी मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. गिरीष महाजन यांनी ग्राम विकास आणि रोटरी इंटरनॅशनल व अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे या संस्थाशी भागीदारीची घोषणा केली. याआधी रिलायन्स फाऊंडेशन, हुडको व आय.आय.टी. मुंबई यांच्याशी भागीदारीची घोषणा करण्यात आली होती.

ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे काम गतिमान व गुणवत्तापूर्ण करण्यासाठी रिलायन्स फाऊंडेशने ३०० घरकुलांना अर्थसहाय्य दिले. रोटरी क्लबने ५०० लाभार्थ्यांना अर्थसहाय्य दिले. आय.आय.टी. मुंबई यांनी १३०० ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांना तांत्रिक प्रशिक्षण दिले. तर अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांनी राज्यातील २७ जिल्ह्यांमध्ये ३० विद्यार्थी इंटर्नशीप करीता पूर्ण वेळ उपलब्ध करून दिले.



# पावसापूर्वी गृहप्रवेशासाठी अमृत महा आवास अभियानाला मुदतवाढीची घोषणा

## मा. मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज, श्री. गिरीष महाजन



राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण आवास योजनांची अंमलबजावणी गतिमान करण्यासाठी व त्यामध्ये गुणवत्ता आणण्यासाठी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्त दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनापासून ते ३१ मार्च, २०२३ या कालावधीत अमृत महा आवास अभियान २०२२-२३ राबविण्यात येत आहे. या अभियानाला राज्यात मिळालेले यश पाहता व लाभार्थ्यांना पावसाळ्यापूर्वी गृहप्रवेश करण्यासठी ०५ जून २०२३ पर्यंत मुदतवाढीची घोषणा मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. गिरीष महाजन यांनी केली.

राज्यात अमृत महा आवास अभियानाला भरघोस यश मिळाले असून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण आवास योजनांमधून अभियान कालावधीत राज्यात मोठ्या प्रमाणात घरकुलाचे बांधकाम करण्यात आले असून प्रगतीवर असलेल्या घरकुलाचे बांधकाम लवकरच पूर्ण करण्यात येईल. तसेच ग्रामीण भागात अभियानाला मिळालेले यश पाहता व राज्यातील पात्र लाभार्थ्यांना पावसापूर्वी गृहप्रवेश करता यावा तसेच घरकुलासोबतच शासनाच्या इतर योजनांचा लाभ देऊन त्याचे जीवनमान उंचावावे व उर्वरित घरकुलाचे काम गुणवत्तापूर्ण आणि जलदगतीने पूर्ण करण्यात यावे यासाठी ५ जून २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याचे मा. मंत्री महोदयांनी सांगितले.

मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री.गिरीष महाजन म्हणाले की, अभियान कालावधीत वेळेत दर्जेदार घरकुले व प्रगतीपथावर असलेले घरकुलेही पूर्ण व्हावी तसेच बांधकामासाठी गवंड्यांची कमतरता भासू नये यासाठी गवंडी प्रशिक्षण राबविण्यात येत आहे. अभियान कालावधीत नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत असून यामध्ये ग्रामीण गृहनिर्माण लाभार्थ्यांच्या बहुमजली इमारती, गृहसंकुले व हाऊसिंग अपार्टमेंट यांच्या सहकारी संस्था स्थापन करणे. वाळूला पर्याय म्हणून क्रश सॅण्ड, सिमेंट ब्लॉक, फ्लाय अॅश ब्रिक्स, इंटर लॉकींग ब्रिक्स, हॉलो ब्रिक्स, इत्यादींचा वापर करणे. किमान १०% घरकुल बांधकामासाठी स्थानिक बांधकाम साहित्य, नवनवीन बांधकाम तंत्रज्ञान, किफायतशीर बांधकाम तंत्रज्ञान, नैसर्गिक आपत्ती रोधक तंत्रज्ञान, इ. चा वापर करणे. किमान १०% घरकुल बांधकामामध्ये फरशी/ लादी, रंगरंगोटी, किचन गार्डन/परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टींग, सौरउर्जा साधने व नेट बिलींग, इ.चा वापर करणे. घरावर ग्रामीण गृहनिर्माण योजनेचा लोगो, पती पत्नीचे नाव व ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवही मध्ये घरकुलाची नोंद इ. करणे, इ. उपक्रमांचा समावेश असल्याचे मा. मंत्री महोदयांनी सांगितले.

या सोबतच घरकुल मार्ट, लॅण्ड बँक, सॅण्ड बँक, कॉप-शॉप यांच्या उभारणीचे कामही करण्यात येत आहे. लाभार्थ्यांना अधिक सोयीसुविधायुक्त घरकुल बांधकामासाठी बँकेचे ७० हजार रुपये गृहकर्ज उपलब्धता, मुलभूत नागरी सुविधा देवून आदर्श घरकुलाची निर्मिती, असे उपक्रम अभियान कालावधीत राबविण्यात येत असून येत्या कालावधीत अमृत महा आवास अभियान मिशन मोडवर राबवून ग्रामीण भागातील सर्व बेघरांना आदर्श पद्धतीची घरकुले जलदगतीने उपलब्ध करून देण्यात येतील यासाठी अभियानात सर्व लोकप्रतिनिधी अधिकारी कर्मचारी आणि ग्रामस्थांनी सक्रीय सहभाग घेऊन अभियान यशस्वी करण्याचे आवाहन मा. मंत्री ग्राम विकास व पंचायत राज, श्री. गिरीष महाजन यांनी केले.

# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत पश्चिम भारत प्रादेशिक कार्यशाळा

ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्यावतीने लोणावळा, पुणे येथे दिनांक १६ व १७ जून, २०२३ रोजी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत दोन दिवसीय पश्चिम भारत प्रादेशिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळे करीता महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, गोवा, दिव-दमण व दादरा-नगर हवेली या राज्ये/ केंद्रशासीत प्रदेशांचे प्रतिनिधींना मार्गदर्शन करण्यासाठी ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकारचे मा. महानिदेशक श्री. गया प्रसाद, मा. उपसचिव श्री. शक्तीकांत सिंह, अवर सचिव श्री.



अनिल सिंह, सहाय्यक कक्षाधिकारी श्री. अभिषेक कोमल, वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी श्री. सुभाष द्विवेदी यांच्या समवेत N I C - R D भारत सरकारचे मा.महानिदेशक श्री. संजय पांडे, सह सचिव श्री. अजय मोर, श्री. अभिषेक श्रीवास्तव व श्री. दिपक शुक्ला उपस्थित होते.

या कार्यशाळेला गुजरात राज्यातून सहाय्यक आयुक्त श्री. सुनिल वासावा, सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्री. क्रिष्णा व्यास, सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्री.मोहसिन अब्बासी, राजस्थान राज्यातून मा. सचिव, ग्रामीण विकास विभाग श्रीमती मंजू राजपाल, कार्यकारी अभियंता श्री. अशोक गहलोट, गट विकास अधिकारी श्री. जसराम माटोरीया, कार्यकारी अभियंता श्री. बी.एल. गुप्ता, गोवा राज्यातून प्रकल्प अधिकारी श्री. वेल्टन टेल्लीस, प्रकल्प अधिकारी श्री. सुयांश खांडेपरकर, मध्य प्रदेश राज्यातून प्रकल्प संचालक श्री. आर.एस. बघेल व गट विकास अधिकारी अरूण मुकाती इ. इतर राज्यांचे अधिकारी उपस्थित होते.

या कार्यशाळेला महाराष्ट्र राज्यातून मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले यांच्यासह संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे, उपसंचालक श्री.नीलेश काळे, सहाय्यक संचालक (लेखा) श्रीमती अपर्णा पाटणे व राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच महाराष्ट्र राज्यातील सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा दिनांक १६ जून, २०२३ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे उपस्थित होते. दिनांक १७ जून, २०२३ रोजी कार्यशाळेतील सर्व अधिकाऱ्यांनी क्षेत्रीय भेटी केल्या.




## गोंदिया जिल्ह्यात मा. खासदार यांच्या अध्यक्षतेखाली स्त्री शक्ती समाधान शिबीरामध्ये घरकुल लाभार्थ्यांच्या समस्यांचे निराकरण

गोंदिया जिल्ह्याचे मा. खासदार श्री. सुनिलजी मेंढे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३० मे, २०२३ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, गुरूकृपा सभागृह, पंचायत समिती गोरेगांव येथे स्त्री शक्ति समाधान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला गोरेगांव पंचायत समितीचे सभापती श्री. मनोजजी बोपचे, गोरेगांव पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. डि. बी. उइके, गोरेगांव पंचायत समितीचे विस्तार अधिकारी ( पंचायत) श्री.टी.डी.बिसेन, गोरेगांव पंचायत समितीचे स्थापत्य अभियांत्रिकी सहायक तथा नोडल अधिकारी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण श्री.ए.टी.टेंभरे, ग्रामीण गृह निर्माण अभियंता (RHE) श्री. योगेश बांते, श्री.समित सांगोडे, श्रीमती गौरी बघेले, श्री. संजय बिसेन, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण ऑपरेटर व गोरेगांव पंचायत समिती मधील इतर विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या समाधान शिबिराचे आयोजन ग्रामीण भागातील विविध योजनांच्या लाभार्थ्यांच्या समस्याचे निराकरण करण्याचे हेतुने करण्यात आले होते. यावेळी विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांनी तसेच जे लोक घरकुल योजनेच्या लाभापासुन वंचित आहेत अशा लोकांनी अर्जद्वारे आपल्या समस्या मांडल्या. घरकुल लाभार्थ्यांच्या समस्या जाणून घेण्याकरीता घरकुल योजना समाधान स्टॉल लावण्यात आला होता. या स्टॉलवर विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना विषयी माहिती देण्यात आली. तसेच घरकुल लाभार्थ्यांच्या समस्या जाणून त्यांना मार्गदर्शन करून त्यांचे समाधान करण्यात आले.

घरकुल योजना समाधान स्टॉलवर घरकुल लाभार्थी, अधिकारी, पदाधिकारी, लोक व मोठया संख्याने महिला लाभार्थ्यांनी भेटी दिल्यात.





## महा आवास अभियान २.० अंतर्गत राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीची बैठक संपन्न

महा आवास अभियान २.० अंतर्गत राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीचे अध्यक्ष तथा मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास पंचायत राज विभाग श्री. राजेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७ एप्रिल, २०२३ रोजी मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायतराज विभाग यांचे दालन ७ वा मजला, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई येथे दुपारी ३.०० वा. बैठक संपन्न झाली.

या बैठकीला मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास पंचायत राज विभाग यांच्यासह मा. अतिरिक्त मुख्य सचिव, आदिवासी विकास विभाग डॉ. प्रदीप व्यास, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे, अवर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग श्री. अनिल आहिरे, कक्ष अधिकारी, इतर मागास बहुजन विकास विभाग श्री.श्रीनाथ हेंन्द्रे, कक्ष अधिकारी, इतर मागास बहुजन विकास विभाग श्री.सुशांत कुंभार इ. समिती सदस्य उपस्थित होते. त्यासोबतच राज्य व्यवस्थापन कक्षातील उपसंचालक (प्र.आ.यो.) श्री. नीलेश काळे, उपसंचालक (रा.यो.) श्रीमती मंजिरी टकले, राज्य संनियंत्रण व मूल्यमापन समन्वयक डॉ. संघरत्न सोनवणे, राज्य प्रशिक्षण समन्वयक (IEC) श्री. दिनेश मोवळे व लघु लेखक श्रीमती माधुरी चौधरी इ. अधिकारी उपस्थित होते.

संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण तथा समिती सदस्य सचिव यांनी बैठकीच्या सुरूवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने बैठकीच्या विषय पत्रिकेनुसार राज्यातील महा आवास अभियान २०२१-२२ च्या अंमलबजावणीबाबतची माहिती सर्व उपस्थित सदस्यांना दिली. या बैठकीच्या विषय पत्रिकेनुसार बैठकीत चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. यामध्ये मागील बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले व तसा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

'सर्वांसाठी घरे- २०२४' या शासनाच्या धोरणांतर्गत विविध उपक्रम राबवून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता आणणे यासाठी दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ ते ३० जून, २०२२ दरम्यान महा आवास अभियान २०२१-२२ राबविण्यात आले. या कालावधीत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करुन उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांना पुरस्कार देवून गौरविण्या संदर्भात दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद आहे.

त्यानुसार संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण तथा समिती सदस्य सचिव यांनी महा आवास अभियान २०२१-२२ अंतर्गत झालेल्या कामाबाबत व त्यानुसार राज्यात विविध स्तरावर देण्यात येणाऱ्या पुरस्काराबाबत बैठकीमध्ये सादरीकरण केले. दहा उपक्रमांच्या साद्याच्या टक्केवारीच्या प्रमाणात गुणांकन करून एकत्रित गुणानुक्रमांच्या आधारे विभागीय अंमलबजावणी संनियंत्रण व मूल्यमापन समितीने पाठविलेल्या अहवालावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार राज्यस्तरीय समितीने महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कारांची निवड व पुरस्कार वितरणास मान्यता देणेबाबत ठराव मंजूर करण्यात आला.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने सदस्य सचिव, राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती तथा संचालक ,राज्य व्यवस्थापन कक्ष—ग्रामीण गृहनिर्माण यांनी उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.




## मुख्य कार्यकारी अधिकारी धुळे यांनी घेतला घरकुल योजनांचा आढावा

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धुळे श्रीमती बुवनेश्वरी यांचे अध्यक्षतेखाली व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. बोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २४ जुन, २०२३ रोजी सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची आढावा बैठकघेण्यात आली. या बैठकीला धुळे जिल्ह्यातील सर्व पंचायत समितींचे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, डेटा एन्ट्री ऑपरेटर त्यासोबतच ग्रामपंचायतींचे ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक उपस्थित होते.

या आढावा बैठकीमध्ये श्री. बोटे यांनी सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रगती बाबत सादरीकरण केले. त्यानुसार श्रीमती बुवनेश्वरी यांनी

गावनिहाय विविध घरकुल योजनांचा आढावा घेतला. त्यानुसार त्यांनी मंजूर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे तात्काळ वितरण करणे, भूमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता करणे, घरकुलांच्या भौतिक प्रगतीनुसार सर्व हप्ते वितरीत करणे, अमृत महा आवास अभियानात नावीन्यपूर्ण उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करणे व अभियान कालावधीत जास्तीत जास्त घरकुलांचे बांधकाम पूर्ण करणे अशा सूचना उपस्थितांना केल्या.



## प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यासाठी मोहिम

मा.मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज श्री.गिरीष महाजन यांचे अध्यक्षतेखाली व मा.अतिरिक्त मुख्य सचिव ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.राजेश कुमार यांचे प्रमुख उपस्थितीत दिनांक ०४ व ०५ फेब्रुवारी, २०२३ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची राज्यस्तरीय कार्यशाळा पुणे येथे संपन्न झाली. या कार्यशाळे मध्ये मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुले पूर्णत्वाची गती अतिशय कमी असल्याबाबत तीव्र नाराजी व असमाधान व्यक्त केले. या अनुषंगाने पुणे, कोकण, अमरावती, नागपूर व नाशिक विभागातील अपूर्ण घरकुले जलद गतीने पूर्ण करण्यासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे यांचे संकल्पनेतून राज्यस्तरीय संपर्क अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली मोहिम राबविण्यात आल्या.


या मोहिमेत जी घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण आहेत, परंतु त्यांचे फोटो घेतले नाहीत, तसेच फोटो आवास सॉफ्ट प्रणालीवर अपलोड केले नाहीत व तालुकास्तरावरुन approve केले नाहीत, अशी घरकुले online पूर्ण करुन घेण्यात आली. बांधकामाच्या टप्प्यानुसार घरकुलांना दुसरा व तिसरा हप्ता वितरीत करून घरकुल भौतिकदृष्ट्या पूर्ण करण्यात आली. प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यासाठी योग्य नियोजन करून लोक अदालत, लाभार्थ्यांना गृहभेटी व बैठका, इ. माध्यमातून प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यात आली. अशा प्रकारची कार्यवाही या मोहिम कालावधीत करून जलद गतीने घरकुले पूर्ण केली.

तसेच या मोहिम कालावधीत ग्रामविकास अधिकारी/ ग्रामसेवक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, तालुकास्तरीय डेटा एन्ट्री ऑपरेटर व तालुकास्तरीय नोडल अधिकारी यांना, त्यांना ठरवून दिलेल्या आपल्या कार्यक्षेत्रात उपस्थित राहणेबाबत सूचित करण्यात आले. याकामी संबंधित जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांचे प्रकल्प संचालक व पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी यांनी आवश्यक ते सर्व सहकार्य केले.

**दिनांक ११ एप्रिल, २०२३ ते १५ एप्रिल, २०२३ या कालवधीत राबविण्यात आलेली मोहिम**

अमरावती व नागपूर विभाग मोहिम करीता राज्यस्तरीय संपर्क अधिकारी उपसंचालक श्री. नीलेश काळे व राज्य समन्वयक (संनियंत्रण व मूल्यमापन) डॉ. संघरत्न सोनवणे नागपूर येथे उपस्थित होते. त्यासोबतच अमरावती विभागीय प्रोग्रामर श्री. मोहसिन अली, नागपूर विभागीय प्रोग्रामर श्री. शुभम हर्षे यांच्यासह अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, चंद्रपुर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली व वर्धा जिल्ह्यांचे जिल्हा प्रोग्रॅमर नागपूर येथे उपस्थित होते.

नाशिक विभाग मोहिम करीता राज्यस्तरीय संपर्क अधिकारी राज्य प्रशिक्षण समन्वयक श्री.मधुकर वाघ व राज्य समन्वयक (MIS) श्री. मायकल एँल्डण नाशिक येथे उपस्थित होते. त्यासोबतच नाशिक विभागीय प्रोग्रामर श्री. सिद्दीकी यांच्यासह नाशिक, धुळे, जळगांव, नंदुरबार व अहमदनगर जिल्ह्यांचे जिल्हा प्रोग्रॅमर नाशिक येथे उपस्थित होते.





औरंगाबाद विभाग मोहिम करीता राज्यस्तरीय संपर्क अधिकारी राज्य समन्वयक (माहिती व तंत्रज्ञान) श्री. राम आघाव औरंगाबाद येथे उपस्थित होते. त्यासोबतच औरंगाबाद विभागीय प्रोग्रामर श्री. उमेश स्वामी यांच्यासह औरंगाबाद, लातूर, बीड, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, नांदेड व जालना जिल्ह्यांचे जिल्हा प्रोग्रॅमर औरंगाबाद येथे उपस्थित होते.

पुणे व कोकण विभाग मोहिम करीता राज्यस्तरीय संपर्क अधिकारी सहाय्यक संचालक श्रीमती अपर्णा पाटणे व राज्य प्रशिक्षण समन्वयक (माहिती, शिक्षण व संवाद) श्री. दिनेश मोवळे पुणे येथे उपस्थित होते. त्यासोबतच पुणे विभागीय प्रोग्रामर श्री.आप्पासाहेब जाधव यांच्यासह पुणे, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, सातारा, ठाणे, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यांचे जिल्हा प्रोग्रॅमर पुणे येथे उपस्थित होते.

दिनांक ११ ते १५ एप्रिल, २०२३ या मोहिम कालावधीत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अंतर्गत पुणे विभागात ५४०, अमरावती विभागात २,११७, नागपूर विभागात १,२३९, नाशिक विभागात १,६७४, औरंगाबाद विभागात ३,०५३ व कोंकण विभागात ५९० अशी एकुण ९,२१३ अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यात आली.

**दिनांक २२ मे, २०२३ ते २६ मे, २०२३**
**या कालवधीत राबविण्यात आलेली मोहिम**

अमरावती व नागपूर विभाग मोहिम करीता राज्यस्तरीय संपर्क अधिकारी राज्य समन्वयक (संनियंत्रण व मूल्यमापन) डॉ. संघरत्न सोनवणे व विस्तार अधिकारी श्री. संतोष ठोंबरे नागपूर येथे उपस्थित होते. त्यासोबतच अमरावती विभागीय प्रोग्रामर श्री. मोहसिन अली, नागपूर विभागीय प्रोग्रामर श्री. शुभम हर्षे यांच्यासह अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, चंद्रपुर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली व वर्धा जिल्ह्यांचे जिल्हा प्रोग्रॅमर नागपूर येथे उपस्थित होते.

नाशिक विभाग मोहिम करीता राज्यस्तरीय संपर्क अधिकारी राज्य समन्वयक (MIS) श्री. मायकल ऍल्डण व राज्य समन्वयक (MIS) श्री. संघपाल चव्हाण धुळे येथे उपस्थित होते. त्यासोबतच नाशिक विभागीय प्रोग्रामर श्री. सिद्दीकी यांच्यासह नाशिक, धुळे, जळगांव, नंदुरबार व अहमदनगर जिल्ह्यांचे जिल्हा प्रोग्रॅमर धुळे येथे उपस्थित होते.



औरंगाबाद विभाग मोहिम करीता राज्यस्तरीय संपर्क अधिकारी राज्य समन्वयक (माहिती व तंत्रज्ञान) श्री. राम आघाव परभणी येथे उपस्थित होते. त्यासोबतच औरंगाबाद विभागीय प्रोग्रामर श्री. उमेश स्वामी यांच्यासह औरंगाबाद, लातूर, बीड, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, नांदेड व जालना जिल्ह्यांचे प्रोग्रॅमर परभणी येथे उपस्थित होते.

पुणे व कोकण विभाग मोहिम करीता राज्यस्तरीय संपर्क अधिकारी राज्य प्रशिक्षण समन्वयक (माहिती, शिक्षण व संवाद) श्री. दिनेश मोवळे सातारा येथे उपस्थित होते. त्यासोबतच पुणे विभागीय प्रोग्रामर श्री.आप्पासाहेब जाधव यांच्यासह पुणे, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, सातारा, ठाणे, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यांचे जिल्हा प्रोग्रॅमर सातारा येथे उपस्थित होते.

दिनांक २२ ते २६ मे, २०२३ या मोहिम कालावधीत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अंतर्गत पुणे विभागात ७८३, अमरावती विभागात ३,८९६, नागपूर विभागात २,९५६, नाशिक विभागात २,६५९, औरंगाबाद विभागात ४,९२३ व कोंकण विभागात ७८४ अशी एकुण १६,००१ अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यात आली.

या मोहिमे दरम्यान अमृत महा आवास अभियान अंतर्गत इंदिरा आवास योजनेंतर्गत सन २०१४-१५ व त्यापूर्वी भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेल्या घरकुल लाभार्थ्यांना सिंगल पेज एन्ट्रीनुसार तात्काळ निधी वितरीत करणे व सन २०१५-१६ मध्ये मंजूर घरकुलांच्या यादीनुसार प्राधान्याने सदर घरकुले भौतिक व आर्थिक दृष्ट्या पूर्ण करणे याकरीता राज्यस्तरीय अधिकारी श्री. दिनेश मोवळे यांनी सातारा जिल्ह्यातील तर श्री. संतोष ठोंबरे यांनी नागपूर व वर्धा जिल्ह्यातील इंदिरा आवास योजनांच्या घरकुलांना भेटी देवून लाभार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन केले.



## मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केली वेल्हे तालुक्यातील घरकुलांची पहाणी

पुणे जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण विकास यंत्रणा यांचे मार्फत गरिब, गरजू व भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ देण्यासाठी केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन करण्यासाठी दिनांक ३० जून, २०२३ रोजी पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.आयुष प्रसाद यांनी वेल्हे तालुक्यातील विविध योजनांच्या घरकुलांची पाहणी केली.

श्री. आयुष प्रसाद यांच्या सोबत पुणे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती शालीनी कडू, वेल्हे पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, जिल्हा व तालुकास्तरावरील संबंधित अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी श्री. आयुष प्रसाद यांनी वेल्हे तालुक्यातील प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत घरकुल योजनांची पहाणी केली. त्यासोबत यावेळी वेल्हे तालुक्यातील रोजगार हमी योजनेच्या कामाचीही तपासणी केली. तसेच उपस्थित लाभार्थी, ग्रामसेवक, अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ यांना मार्गदर्शन केले.



## मुख्य कार्यकारी अधिकारी सातारा यांचे शुभहस्ते गृह संकुलाचे भूमिपूजन

दिनांक १० मे, २०२३ रोजी सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ज्ञानेश्वर खिल्लारी यांच्या शुभहस्ते प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सातारा जिल्हा व तालुक्यांतर्गत ग्रामपंचायत लिंब येथे उभारण्यात येणाऱ्या गृह संकुलाचे भूमिपूजन करण्यात आले. याप्रसंगी सातारा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, लिंब ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य, ग्रामस्थ, सर्व लाभार्थी कुटुंब, ग्रामसेवक, तलाठी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

सातारा तालुक्यातील लिंब ग्रामपंचायती मध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत १५ घरकुल लाभार्थ्यांसाठी गृह संकुल उभारण्यात येणार आहे. या लाभार्थ्यांना पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेतून ८ आर + २ आर रस्ता जागा उपलब्ध करून देण्यात आली. तसेच सर्व लाभार्थ्यांच्या बँक खाती रक्कम रुपये ५० हजार प्रती लाभार्थी प्रमाणे निधी जमा करण्यात आला. सर्व लाभार्थ्यांची जागा मालकी नोंद ७/१२ ला घेऊन तसे ७/१२ उतारे श्री. ज्ञानेश्वर खिल्लारी यांचे हस्ते लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घरकुल लाभार्थी कुटुंबाच्या (पति-पत्नी) शुभहस्ते भूमिपूजन करण्याचे सांगितले.

लिंब या गावामध्ये उभारण्यात येणाऱ्या गृह संकुलाकरीता पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेतून रक्कम रू. ७.५० लाख, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधून रक्कम रू. २३.१० लाख तर इतर मार्गाने रक्कम रू. १३.६१ लाख असा एकुण रक्कम रुपये ४४.३३ लाख एवढा निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. यामुळे पिढ्यानपिढ्या ऊसाच्या पाचटीच्या कोपीत निसर्गाशी सामना करत वास्तव्य करणाऱ्या या कुटुंबाना हक्काचा पक्का निवारा उपलब्ध होणार असल्याचे सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.ज्ञानेश्वर खिल्लारी यांनी सांगितले.

या गृहसंकुलामुळे आम्हाला पक्क्या घरकुलासह इतर योजनांचा लाभ मिळणार असल्याने आमचे जीवनमान उंचावणार असल्याचे घरकुल लाभार्थ्यांनी सांगितले.





# मा. मंत्री, रोजगार हमी योजना व फलोत्पादन यांच्या शुभहस्ते औरंगाबाद येथे जिल्हास्तरीय महा आवास अभियान पुरस्कार विजेत्यांचा गौरव

राज्यात केंद्र व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता वाढीसाठी दिनांक २० नोव्हेबर, २०२१ ते दिनांक ३० जून, २०२२ या कालावधीत महा आवास अभियान २०२१-२२ राबविण्यात आले. या अभियान कालावधीत उत्कृष्ट कामगिरी करणारे व्यक्ती किंवा संस्था यांना महा आवास अभियान पुरस्कार देवून गौरविण्याचे शासनाचे निर्देश होते. त्यानुसार दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी मा. मंत्री, रोजगार हमी योजना व फलोत्पादन तथा औरंगाबाद जिल्हयाचे पालकमंत्री श्री. संदिपान भुमरे यांच्या शुभहस्ते महा आवास अभियान २०२१-२२ अंतर्गत जिल्हास्तरीय पुरस्कार वितरण सोहळा औरंगाबाद येथे संपन्न झाला.

याप्रसंगी औरंगाबाद जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विकास मिना, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती संगितादेवी पाटील, जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) श्री. सुदर्शन तुपे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) श्री. ओमप्रकाश रामावत, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व मग्रारोहयो) श्री. राजेंद्र देसले, श्री. एन.टी.डोगरे (विस्तार अधिकारी), श्री. राहुल वाघ, (आरेखक), श्री. सुदेश रोकडे (जिल्हा प्रोग्रामर), श्री. निलेश राठोड (जिल्हा ऑपरेटर), जिल्हास्तरीय पुरस्कार विजेते, पदाधिकारी, मिडिया प्रतिनिधी, संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# महा आवास अभियानामुळे लाखो गरिब, गरजू, बेघर व भूमिहीनांची गृह स्वप्नपूर्ती

## मा. मंत्री, कृषी तथा पालकमंत्री, हिंगोली जिल्हा, श्री. अब्दुल सत्तार

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६३ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून दिनांक १ मे, २०२३ रोजी मा.मंत्री, कृषी तथा हिंगोली जिल्ह्याचे पालकमंत्री श्री.अब्दुल सत्तार यांच्या शुभहस्ते संत नामदेव पोलीस कवायत मैदान, हिंगोली येथे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा हिंगोली यांचे मार्फत महा आवास अभियान ग्रामीण २०२१- २२ मधील उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना महा आवास अभियान पुरस्कार देवून गौरविण्यात आले.

यावेळी महा आवास अभियान पुरस्कार २०२१-२२ अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण सर्वोत्कृष्ट तालुके, सर्वोत्कृष्ट क्लस्टर, सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत तसेच राज्य पुरस्कृत आवास योजने अंतर्गत सर्वोत्कृष्ट तालुके, सर्वोत्कृष्ट क्लस्टर, सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत, इ. पुरस्कारांचे वितरण मा.मंत्री, कृषी तथा हिंगोली जिल्ह्याचे पालकमंत्री श्री.अब्दुल सत्तार यांच्या शुभहस्ते करण्यात आले. महा आवास अभियान २०२१-२२ पुरस्कार विजेत्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.

याप्रसंगी मा. मंत्री महोदयांनी सांगितले की, महा आवास अभियानामुळे लाखो गरिब, गरजु, बेघर व भुमिहीन लाभार्थ्यांचे घरकुलांचे स्वप्न पूर्ण झाले आहे. तसेच या अभियानामुळे ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता आली आहे. ग्राम विकास व पंचायत राज विभागाच्या राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण मार्फत राबविण्यात येणारे हे अभियान खरोखर कौतुकास्पद असून अशा उपक्रमांची अंमलबजावणी इतरही योजनांमध्ये होणे आवश्यक असल्याचे मा.मंत्री महोदयांनी सांगितले.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास हिंगोली जिल्ह्याचे मा. खासदार श्री. हेमंत पाटील, कळमनुरीचे मा. आमदार श्री.संतोष बांगर, जिल्हाधिकारी श्री.जितेंद्र पापळकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजय दैने, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. नामदेव केंद्रे, जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, जिल्हा प्रोग्रामर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, सर्व ऑपरेटर, पुरस्कारार्थी यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते



# केंद्रीय माहिती, शिक्षण व संवाद पथकाचा महाराष्ट्र राज्याचा दौरा

राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविण्यात येतात. या योजनांची माहिती तसेच ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात राबविण्यात येणारे नावीन्यपूर्ण उपक्रम व त्यांच्या यशोगाथा, इ. ची प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृती सर्वस्तरावर होण्यासाठी माहिती, शिक्षण व संवाद अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येतात.

अशाच उपक्रमांची माहिती संकलीत करण्यासाठी व त्यांचे ऑडिओ व व्हिडिओ स्वरूपात दस्ताऐवजीकरण करण्यासाठी दिनांक १५ मे, २०२३ ते दिनांक १७ मे, २०२३ या कालावधीत ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकारच्या केंद्रीय IEC Team ने महाराष्ट्र राज्याचा दौरा केला. या केंद्रीय IEC Team मध्ये तांत्रिक सहाय्य श्री. रिशल सिंह, कन्टेन्ट मॅनेजर श्री. नंदा किशोर व फोटोग्राफर श्री. मोहीत शर्मा, इ. अधिकाऱ्यांचा समावेश होता.

केंद्रीय IEC Team ने महाराष्ट्रातील भंडारा, अमरावती व पालघर जिल्ह्यांतील केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत बहुमजली इमारती, गृह संकुल व घरकुलांची फोटोग्राफी, व्हिडिओ शुटिंग केली. तसेच घरकुल लाभार्थ्यांच्या मुलाखतीचे रेकॉर्डींग करण्यात आले.

या दौरा कार्यक्रमात केंद्रीय समिती समवेत राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे उपसंचालक श्री. नीलेश काळे, प्रशिक्षण समन्वयक (IEC) श्री. दिनेश मोवळे व वास्तुविशारद श्री. परमेश्वर शेलार उपस्थित होते.





# अमृत महा आवास अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी गोरेगांव तालुक्यात माहिती, शिक्षण व संवाद उपक्रमांची अंमलबजावणी

राज्यातील सर्व स्तरावर अमृत महा आवास अभियान २०२२-२३ च्या प्रभावी अमलबजावणीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने दिनांक १८ एप्रिल, २०२३ रोजी गोंदिया जिल्ह्यातील पंचायत समिती, गोरेगांवचे गट विकास अधिकारी श्री.अजित सिंह पवार यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समिती अंतर्गत सर्व ग्रामपंचायतींच्या ग्रामसेवक व ग्राम विकास अधिकारी यांची अमृत महा आवास अभियान २०२२-२३ च्या प्रगती बाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीला पंचायत समिती गोरेगांवचे विस्तार अधिकारी, डेटा एण्ट्री ऑपरेटर, ग्रामीण गृह निर्माण अभियंता यांच्यासह इतर संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या आढावा बैठकीमध्ये अमृत महा आवास अभियान २०२२-२३ अंतर्गत राबविण्यात आलेल्या सर्व उपक्रमांचा गावनिहाय आढावा घेण्यात आला. तसेच दिनांक १७ एप्रिल, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये अभियानाला दिलेल्या मुदतवाढीबाबत सर्व उपस्थितांना अवगत करण्यात आले. त्यानुसार येत्या अभियान कालावधीत महा आवास अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी अभियानाचे पोस्टर प्रकाशित करण्यात आले. तसेच हे पोस्टर गावोगावी लावण्याच्या सूचना गोरेगांवचे गट विकास अधिकारी श्री.अजित सिंह पवार यांनी सर्व ग्रामसेवक व ग्राम विकास अधिकारी यांना दिल्या.

अमृत महा आवास अभियान अंतर्गत सर्व उपक्रम पूर्ण होण्याकरीता सूक्ष्म नियोजन करावे, अभियान यशस्वीतेसाठी सर्वांनी सर्वोत्तोपरी प्रयत्न करावे, अभियान कालावधीत मंजूर सर्व घरकुले व प्रलंबित घरकुले पूर्ण करावे, भूमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता करावी, नावीन्यपूर्ण उपक्रम राबवावे व या अभियानात सर्वांनी सक्रीय सहभाग नोंदवावा असे श्री.अजित सिंह पवार यांनी सर्वांना सूचित केले.



## मा. आमदार यांच्या शुभहस्ते कमी कालावधीत घरकुल बांधणारे लाभार्थी सन्मानित

दिनांक १७ मे, २०२३ रोजी जालना जिल्ह्यातील पंचायत समिती मंठा येथे मा. आमदार श्री.बबनराव लोणीकर यांच्या अध्यक्षतेखाली शासन आपल्या दारी या योजनेची शासकीय जत्रा हा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी पंचायत समितीचे सभापती, सदस्य, इतर पदाधिकारी, गट विकास अधिकारी, तालुक्यातील ग्रामपंचायतींचे सरपंच, सदस्य, ग्रामसेवक, ग्राम विकास अधिकारी, विविध योजनांचे लाभार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यात राबविण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य पुरस्कृत विविध योजनांची माहिती व लाभ थेट लाभार्थ्यांना मिळावा याकरीता शासन आपल्या दारी या उपक्रमाची अंमलबजावणी संपर्ण राज्यात सुरू असून या उपक्रमाला सर्वस्तरावरून चांगला प्रतिसाद मिळतो आहे. या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी मंठा तालुक्यामध्ये व्हावी, यासाठी मा. आमदार श्री.बबनराव लोणीकर यांनी सर्व पदाधिकारी, शासकीय यंत्रणा, निम शासकीय यंत्रणा, संस्था, लोक प्रतिनिधी व लोक यांना सक्रीय सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे.

यावेळी लाभार्थ्यांना घरकुल बांधकामास मार्गदर्शन व्हावे, याकरीता डेमो हाऊस व घरकुल मॉडेल दाखविण्यात आले. तसेच घरकुल लाभार्थ्यांना विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांची माहिती देण्यासाठी अमृत महा आवास अभियान अंतर्गत विविध योजनांचे बॅनर, स्टॅण्डी व पोस्टर प्रदर्शन लावण्यात आले. या कार्यक्रमात घरकुल स्टॉल उभारून लाभार्थ्यांना प्रत्यक्षात घरकुल योजनांची माहिती व त्यांच्या अडचणींवर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी कमी कालावधीत घरकुलाचे बांधकाम पूर्ण करणाऱ्या लाभार्थ्यांना मा. आमदार श्री.बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यामुळे लाभार्थी प्रोत्साहीत होवूनजलद गतीने घरकुल बांधकाम पूर्ण करतील हा या मागचा हेतू होता. या कार्यक्रमाला घरकुल लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाला महिला लाभार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भरघोस प्रतिसाद दिला. अशा कार्यक्रमाच्या आयोजनामुळे शासन व लाभार्थी यांच्यात थेट समन्वय साधण्यास मदत होत आहे.





## हदगांव तालुक्यात घरकुल लाभार्थ्यांना गृहभेटी माध्यमातून हात जोडो अभियान

नांदेड जिल्ह्यामध्ये अमृत महा आवास अभियानांतर्गत राबविण्यात येणारे सर्व उपक्रम तसेच केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांची माहितीच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी हदगांव पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री.डी.के. आडेराघो यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत चक्री येथे दिनांक २९ एप्रिल, २०२३ रोजी गृहभेटी देवून हात जोडो अभियान राबविले.

ग्रामपंचायत चक्री येथे गृहभेटी दरम्यान सर्व घरकुल योजनेच्या कामांना गती मिळण्याच्या दृष्टीने प्रत्येक लाभार्थ्यांच्या घरी जाऊन हात जोडो अभियान राबविण्यात आले. तसेच लाभार्थ्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यांचे बांधकाम लवकरात लवकर कसे पूर्ण करता येईल याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. जे लाभार्थी घरकुल बांधकाम करण्यास टाळाटाळ करतात अशा लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम करण्यासाठी हात जोडून विनंती करण्यात आली.

या गृहभेटी करीता ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. विठ्ठल कल्याणकर, श्री. रवि सोळंके, श्री.शरद तुपकरी, डेटा एन्ट्री ऑपरेटर श्री. शेवाळकर, स्वच्छ भारत मिशनचे समुह समन्वयक श्री.सचिन डुरे, ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य, लाभार्थी व ग्रामस्थ यांनी सक्रीय सहभाग नोंदवला.



# अमृत महा आवास अभियान २०२२-२३ अंतर्गत पुरस्कार वितरण मुदतीत करावे

## - संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे

राज्यात ग्राम विकास व पंचायत राज विभागांतर्गत राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण मार्फत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता वाढीसाठी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनापासून ते दिनांक ०५ जून, २०२३ या कालावधीत अमृत महा आवास अभियान-२०२२-२३ राबविण्यात आले.

या अभियान कालावधीत उत्कृष्ट कामगिरी करणारे व्यक्ती वा संस्था यांना अमृत महा आवास अभियान पुरस्कार देवून गौरविण्याचे शासन निर्णयात नमुद असून त्यानुषंगाने ग्रामपंचायतस्तरीय, तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय व विभागस्तरीय पुरस्काराची नामांकने विहीत मुदतीत अंतिम करून मान्यवरांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरीत करण्याच्या सूचना संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे यांनी सर्वस्तरावर निर्गमित केल्या. तसेच अमृत महा आवास पुरस्कार विजेत्यांना प्रदान करावयाचे प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह इ. चे डिझाईन व साईज सर्वस्तरावर इमेलव्दारे उपलब्ध करून देण्यात आली आहे.







# जत तालुक्यात लाभार्थी मेळाव्यांच्या माध्यमातून घरकुल योजनांची जन-जागृती

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची माहिती ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी दिनांक ३ मे, २०२३ रोजी सांगली जिल्ह्यातील जत पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. आप्पासो सरगर यांच्या मार्गदर्शनाखाली जत तालुक्यांतर्गत मिरवाड, जिरग्याल, एकुंडी व वज्रवाड या ग्रामपंचायतींमध्ये लाभार्थी मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले.

या लाभार्थी मेळाव्यात श्री. आप्पासो सरगर यांनी गावातील घरकुल योजनांचा आढावा घेतला. तसेच लाभार्थ्यांच्या अडचणी समजून घरकुल बांधकामासाठी मार्गदर्शन केले. तसेच शासनाच्या घरकुल योजना विषयी माहिती दिली. त्याचप्रमाणे अपूर्ण घरकुल तात्काळ पूर्ण करणे,जे लाभार्थी घरकुल बांधकाम करण्यास इच्छुक नाही तसे घरकुले रिमांड करून रक्कम शासनास परत करणे या विषयी सखोल मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे माझी शाळा आदर्श शाळा, वैयक्तिक नळ कनेक्शन, स्वच्छ भारत अभियान, घरपट्टी व पाणीपट्टी वसुली, इ. बाबतची माहिती दिली. ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य, ग्रामसेवक व लोक यांच्या भूमिका व जबाबदारी या विषयी मार्गदर्शन केले.

जत पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. आप्पासो सरगर यांनी या लाभार्थी मेळाव्यात अमृत महा आवास अभियान २०२२-२३ अंतर्गत राबविण्यात येत असेलेल्या १० उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. तसेच अभियान कालावधीत ग्रामपंचायत स्तरावर सर्वोत्कृष्ट कामगिरी करून ग्रामपंचायतीला अमृत महा आवास पुरस्कार मिळवण्यासाठी प्रोत्साहीत केले.

या लाभार्थी मेळाव्याला पंचायत समितीचे सर्व अधिकारी, कर्मचारी व संबंधित ग्रामपंचायतींचे सरपंच, सदस्य, लाभार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.





## शासन आपल्या दारी कार्यक्रमात घरकुल लाभार्थ्यांना धनादेश व चावी वाटप

शासनाच्या कल्याणकारी योजना लाभार्थ्यांच्या दारी पोहोचत असल्याने 'शासन आपल्या दारी' अभियानास राज्यभरात मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभत आहेत. या अभियानात जिल्हा प्रशासनाने उत्कृष्ट काम केल्याबद्दल मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री. एकनाथ शिंदे यांनी जिल्हा प्रशासनाचे कौतुक केले.

केंद्र सरकारच्या मदतीने आणि सहकार्याने राज्य शासन सर्वसामान्य जनतेसाठी काम करीत आहे. हे सर्वसामान्यांचे सरकार आहे. जिल्ह्याच्या विकास कामांसाठी निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही मा. मुख्यमंत्री, श्री. शिंदे यांनी या कार्यक्रमांच्या वेळी दिली.

या कार्यक्रमांमध्ये मा. मुख्यमंत्री, श्री.एकनाथ शिंदे, मा. उप मुख्यमंत्री, श्री.देवेंद्र फडणवीस आणि मा. उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार यांच्या शुभहस्ते राज्य आणि केंद्र शासनाच्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांना लाभाचे धनादेश, विविध सवलतींचे प्रमाणपत्रे, सायकली, ट्रॅक्टर्स आणि शेतीपयोगी साहित्य वितरित करण्यात आले. या अभियानांतर्गत घरकुल लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात घरकुलांच्या चावी व धनादेश देण्यात आले.

मा. मुख्यमंत्री, श्री. एकनाथ शिंदे, मा. उप मुख्यमंत्री, श्री.देवेंद्र फडणवीस आणि मा. उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार यांच्यासह मा.मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज श्री. गिरिष महाजन व इतर मा. मंत्री महोदयांच्या प्रमुख उपस्थितीत शासन आपल्यादारी अभियानाचा शुभारंभ सर्व जिल्ह्यांमध्ये करण्यात आला. शासन आपल्या दारी अभियानात ग्रामविकास व पंचायतराज विभागाचा सक्रीय सहभाग असल्याचे मा.मंत्री, श्री. गिरिष महाजन यांनी सांगितले.






## राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यकारी समितीची बैठक संपन्न

राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण कार्यकारी समितीची बैठक मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास पंचायत राज विभाग श्री. राजेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७ एप्रिल, २०२३ रोजी बांधकाम भवन, मुंबई येथे दु. ३.३० वा. संपन्न झाली.

या बैठकीला मा. अतिरिक्त मुख्य सचिव, आदिवासी विकास विभाग डॉ. प्रदीप व्यास, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान डॉ. हेमंत वसेकर, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे, अवर सचिव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग श्री. अनिल आहिरे, कक्ष अधिकारी, इतर मागास बहुजन विकास विभाग श्री. श्रीनाथ हेन्द्रे, इतर मागास बहुजन विकास विभाग श्री. सुशांत कुंभार, इ. समिती सदस्यांसह राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी उपस्थित होते.

संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण तथा सदस्य सचिव कार्यकारी समिती डॉ. राजाराम दिघे यांनी या बैठकीत सर्व उपस्थितांचे स्वागत करुन प्रास्ताविक केले. या बैठकीत विषयनिहाय चर्चा होऊन मंजूरीबाबत कार्यवाही करण्यात आली. तसेच राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण व विविध राज्य पुरस्कृत योजनांचा भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल कार्यकारी समितीच्या बैठकीत सादर करण्यात आला. तसेच इतरही ठराव या कार्यकारी समितीच्या बैठकीत पारित करण्यात आले.

मा. अध्यक्षांच्या वतीने सदस्य सचिव, कार्यकारी समिती तथा संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष– ग्रामीण गृहनिर्माण यांनी उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.




## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली अमृत महा आवास अभियान क्षेत्रीय अंमलबजावणी यंत्रणेशी समन्वय बैठका

राज्यात अमृत महा आवास अभियान २०२२-२३ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व क्षेत्रीय अंमलबजावणी यंत्रणेशी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या अध्यक्षतेखाली माहे एप्रिल ते जून २०२३ या कालावधीत विभाग, जिल्हा व तालुकानिहाय समन्वय बैठका दूरदृष्य प्रणालीव्दारे नियमित आयोजित करण्यात आल्या. या बैठकांना विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास), सहाय्यक आयुक्त (विकास), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी व संबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये अमृत महा आवास अभियान अंतर्गत विविध आवास योजनांच्या आर्थिक व भौतिक प्रगतीचा व अभियान कालावधीत राबविण्यात येत असलेल्या १० उपक्रमांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. तसेच नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून बहुमजली इमारती, गृहसंकुल, हाऊसिंग अपार्टमेंट, सॅण्ड बँक, लॅण्ड बँक व इतर विषयांवर आढावा घेण्यात आला. अभियान कालावधीत १० उपक्रमांवर लक्ष केंद्रीत करून जास्तीत जास्त घरकुलांचे बांधकाम करण्याच्या सूचना डॉ.राजाराम दिघे यांनी दिल्या.

दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ ते ०५ जून २०२३ या कालावधीत अमृत महा आवास अभियान २०२२-२३ मध्ये राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करून उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना अमृत महा आवास अभियान पुरस्कार व अमृत महा आवास अभियान विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असल्याचे डॉ.राजाराम दिघे यांनी सांगितले. त्यानुषंगाने सर्व स्तरावरील पुरस्कार मानांकने निवड व पुरस्कार वितरणाबाबत चर्चा करण्यात आली.

ग्रामस्तरीय अमृत महा आवास अभियान पुरस्कार विजेत्यांना प्रदान करावयाचे मानचिन्ह व प्रशस्तीपत्राचे डिझाईन ग्रामस्तर, तालुकास्तर, जिल्हास्तर व विभागस्तरासाठी स्वतंत्रपणे पाठविण्यात येणार असल्याचे डॉ. राजाराम दिघे यांनी सांगितले. सर्व स्तरावरील पुरस्कार नामांकन निवड व पुरस्कार वितरण विहीत मुदतीत करण्याच्या सूचनाही संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांनी या समन्वय बैठकांच्या माध्यमातून सर्व क्षेत्रिय अंमलबजावणी यंत्रणेला दिल्या.




## प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुल बांधकामास गती देण्यासाठी केंद्रीय अधिकाऱ्यांचा महाराष्ट्र राज्याचा दौरा

दिनांक १० व ११ एप्रिल, २०२३ रोजी ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकारचे मा. अवर सचिव श्री.अनिल कुमार सिंह व मा. वरीष्ठ सांख्यिकी अधिकारी श्री. सुभाष व्दिवेदी हे महाराष्ट्र राज्याच्या दौऱ्यावर आले. दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकारच्या अधिकाऱ्यांनी राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकाऱ्यांशी नवी मुंबई येथे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुल बांधकामांना गती देणेबाबत बैठक संपन्न झाली.

या बैठकीला संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे, उपसंचालक श्री. नीलेश काळे, उपसंचालक श्रीमती मंजिरी टकले व सहाय्यक संचालक (लेखा) श्रीमती अपर्णा पाटणे, लेखाधिकारी श्री. वैभव ठाकुर, राज्य समन्वयक श्री. अनिल काळे, राज्य समन्वयक (M&E) डॉ. संघरत्न सोनवणे, वास्तुविशारद श्री. परमेश्वर शेलार, प्रशिक्षण समन्वयक (IEC) श्री. दिनेश मोवळे, राज्य समन्वयक (MIS) श्री. मायकल ऍल्डण व लेखा सहाय्यक श्रीमती अंकीता राऊळ, इ. उपस्थित होते.

दिनांक ११ एप्रिल, २०२३ रोजी ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकारचे मा. अवर सचिव



श्री.अनिलकुमार सिंग यांनी महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्ह्यामधील भिवंडी तालुक्यांतर्गत डोहोळे, कोशिंबी, कळंबोली आणि आन्हे या गावातील प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुलांची पाहणी व घरकुल लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच डोहोळे येथील डेमो हाऊसची पाहणी केली.

यावेळी ठाणे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती छायादेवी शिसोदे, पंचायत समिति भिवंडीचे गट विकास अधिकारी श्री.प्रदिप घोरपडे, ठाणे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे सहायक प्रकल्प अधिकारी श्री. संतोष पांडे, पंचायत समिती भिवंडीच्या विस्तार अधिकारी श्रीमती रेखा पाठे व इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



त्याचप्रमाणे ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकारचे मा. वरीष्ठ सांख्यिकी अधिकारी श्री. सुभाष व्दिवेदी यांनी दिनांक ११ एप्रिल, २०२३ रोजी अहमदनगर जिल्ह्याचा दौरा केला. या दौऱ्या दरम्यान त्यांनी राहाता तालुक्यातील लोणी बु. येथील गृह संकुलास भेट दिली. या गृह संकुलात ५९ लाभार्थी वास्तव्यास आहेत. त्यानंतर पंचायत समिती कोपरगांव येथे डेमो हाऊसला भेट दिली व गट विकास अधिकारी यांचेशी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुल बांधकामाच्या प्रगती बाबत चर्चा केली. तसेच श्री. सुभाष व्दिवेदी यांनी कोपरगांव तालुक्यातील संवतसर बहुमजली इमारती व घरकुलांची पहाणी व वनराई वृक्षारोपनास भेट दिली.




## ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकारच्या अधिकाऱ्यांचा रायगड जिल्हा दौरा प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत डेमो हाऊस व घरकुलांना भेटी

ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकारच्या मा.अतिरिक्त महासंचालक श्रीमती आशा पोळ आणि मा.संचालक श्री. यश पाल यांनी दिनांक ३० जून, २०२३ रोजी महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्ह्याचा दौरा केला. या दौरा कार्यक्रमा दरम्यान त्यांनी रायगड जिल्ह्यात बैठका व क्षेत्रीय भेटी दिल्या.

यामध्ये मा.अतिरिक्त महासंचालक श्रीमती आशा पोळ आणि मा.संचालक श्री. यश पाल यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, प्रकल्प संचालक श्रीमती प्रियदर्शनी मोरे व उप मुख्य कार्यकारी श्री. राजेंद्र भालेराव यांच्या प्रमुख उपस्थितीत सांसद आदर्श ग्राम योजना अंतर्गत सर्व विभाग प्रमुखकांची बैठक जिल्हा परिषद रायगड येथे घेतली. त्यानंतर त्यांनी चिंचोटी व खानावा या सांसद ग्राम योजनेच्या ग्रामपंचायतींना भेट दिली. तसेच अलिबाग पंचायत समिती मधील डेमो हाऊस, RSETI कौशल्य आणि ग्रामीण उद्योजकता केंद्राला भेट दिली. यावेळी त्यांनी प्रशिक्षणार्थी महिलांशी संवाद साधला व मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना त्यांच्या शुभहस्ते प्रशस्तीपत्र देण्यात आले.



ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकारच्या मा.अतिरिक्त महासंचालक श्रीमती आशा पोळ आणि मा.संचालक श्री. यश पाल यांनी अलिबाग जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या भेटी दरम्यान प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत बांधकाम पूर्ण झालेल्या घरकुलांना भेटी दिल्या. त्यानुसार त्यांनी महाराष्ट्र राज्यात घरकुलांचे बांधकाम उत्कृष्ट दर्जाचे होत असल्याची प्रतिक्रीया दिली.



## जालना जिल्ह्यात घरकुले पूर्ण करण्यासाठी प्रकल्प संचालकांनी केली तपासणी

दिनांक ११ एप्रिल, २०२३ रोजी जालना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री.शिरीष बनसोडे यांनी जिल्ह्यातील घरकुले जलद गतीने पूर्ण करण्यासाठी व लाभार्थ्यांना सर्व हप्ते वेळेत वितरीत करण्यासाठी थेट घरकुलांना भेटी देवून घरकुल बांधकामाची तपासणी केली.

श्री. शिरीष बनसोडे यांनी भोकरदन पंचायत समिती येथे भेट देवून तालुक्यातील सर्व ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांचा केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व आवास योजनांच्या प्रगतीचा आढावा घेतला. त्यानुसार श्री.शिरीष बनसोडे यांनी मंजूर घरकुलांना पहिला हप्ता तात्काळ वितरीत करणे. घरकुल बांधकामाच्या प्रगतीनुसार सर्व हप्ते विनाविलंब वितरीत करण्याचे सूचित केले.

अमृत महा आवास अभियान कालावधीत जास्तीत जास्त घरकुल पूर्ण करणे व अभियातील सर्व उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना यावेळी श्री. शिरीष बनसोडे यांनी उपस्थितांना दिल्या.

त्यानंतर श्री. शिरीष बनसोडे यांनी भोकरदन तालुक्यातील ग्रामपंचायतींना भेटी देवून घरकुलांची तपासणी केली. तसेच घरकुल लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाबाबत व निधी मागणी बाबत मार्गदर्शन केले. यावेळी श्री. शिरीष बनसोडे यांच्या सोबत भोकरदन पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. सुरडकर व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता उपस्थित होते.





## ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाची नगरच्या गट विकास अधिकारी यांचेकडून तपासणी

दिनांक १५ मे, २०२३ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील नगर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. श्रीकांत खरात यांनी ग्रामपंचायत नांदगाव येथे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षणातून सुरु असलेल्या कामाला अचानक भेट देवून प्रशिक्षणाची व घरकुल बांधकामाची तपासणी केली. तसेच प्रशिक्षणार्थी यांना मार्गदर्शन केले.

यावेळी श्री. श्रीकांत खरात यांच्यासोबत विस्तार अधिकारी श्री. तुपे, ग्रामसेवक, सरपंच, ग्रामस्थ आणि ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. सुर्यवंशी उपस्थित होते.



## ग्रामीण गृहनिर्माण योजनांची कामे पूर्ण करण्यासाठी खानापूर तालुक्यात गृह भेटी

दिनांक ४ मे २०२३ रोजी सांगली जिल्ह्यातील खानापूर पंचायत समितीचे सहाय्यक गट विकास अधिकारी श्री. माडगूळकर यांनी आळसंद, ढवळेश्वर, वेजेगांव, भिकवडी व वाळूज साळशिंगे या ग्रामपंचायतींना भेटी देवून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व रमाई आवास योजना अंतर्गत मंजूर झालेल्या घरकुल लाभार्थींना गृह भेटी देऊन घरकुल बांधकाम तात्काळ सूरू करणे बाबत सुचित केले. तसेच घरकुल बांधकामाबाबत आवश्यक मार्गदर्शन केले.

यावेळी श्री. माडगूळकर यांच्या समवेत संबंधीत गावचे सरपंच व ग्रामसेवक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता व लाभार्थी उपस्थित होते.



# अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे (COEP)च्या स्थापत्य अभियांत्रिकी विद्यार्थ्यांमार्फत ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात इंटर्नशिपच्या माध्यमातून सहभाग

ग्राम विकास व पंचायत राज विभागाच्या वतीने पुणे येथील आर्किड हॉटेल मध्ये दिनांक ४ ते ५ फेब्रुवारी, २०२३ रोजी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळे मध्ये राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांना चालना देण्यासाठी मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. गिरीष महाजन यांनी मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज श्री. राजेश कुमार व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्राम विकास विभाग आणि रोटरी इंटरनॅशनल व अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे या संस्थाशी भागीदारीची घोषणा केली.



राज्यातील सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये गतिमानता व गुणवत्ता आणणेसाठी दि. २० नोव्हेंबर, २०२२ ते दिनांक ०५ जून, २०२३ दरम्यान 'अमृत महा आवास अभियान-२०२२-२३' राबविण्यात आले. या अभियानात समाजातील सर्व घटकांचा समावेश जसे कॉर्पोरेट संस्था, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था आणि लोकसहभाग घेण्यात आला आहे. याचाच एक भाग म्हणून राज्यातील नामांकित शिक्षण संस्था अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे (COEP) यांचे समवेत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत घरकुल बांधकामामध्ये गुणवत्ता आणण्याच्या दृष्टिकोनातून सहभाग घेण्याबाबत समन्वय करण्यात आला. भागधारकांचे प्रशिक्षण व विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिपच्या माध्यमातून सहभाग घेण्यात आला.



राज्यातील २७ जिल्ह्यांमध्ये २७ स्थापत्य अभियांत्रिकी विद्यार्थी व राज्यस्तरावर ३ विद्यार्थी असे एकूण ३० विद्यार्थी अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे (COEP) यांचे मार्फत उपलब्ध करून देण्यात आले. या विद्यार्थ्यांनी दिनांक २५ मे, २०२३ पासून ते दिनांक २५ जुलै, २०२३ पर्यंत या २ महिन्यांच्या कालावधीत ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात सहभागी होवून विविध विषयांवर कामकाज केले.

या विद्यार्थ्यांनी ग्रामीण गृहनिर्माण अंतर्गत नवनविन बांधकाम तंत्रज्ञान, पर्यावरण पूरक बांधकाम तंत्रज्ञान व आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी बाबत क्षेत्रीय पातळीवर पाहणी करून अहवाल तयार केले. बांधकाम विषयक तांत्रिक समस्या सोडविणे करिता समन्वय केला. Delayed Houses बाबत क्षेत्रीय भेटी देऊन अहवाल तयार केला. जिल्ह्यांच्या स्थानिक भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून बांधकाम साहित्यबाबत अहवाल तयार करण्यात आला. जिल्हास्तरीय डेमो हाऊस बांधकामाचे प्रस्तावित डिझाईन आणि अंदाजित बांधकाम खर्च अंदाजपत्रक तयार करण्यात आले.

या विद्यार्थ्यांनी यशस्वीरीत्या इंटर्नशिप पूर्ण केली असून लवकरच या सर्व विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर प्रशस्तीपत्रक देण्याचे नियोजित आहे. तसेच अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे यांचे मार्फत ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील भागधारकांना कमी खर्चात चांगल्या घरकुल बांधकामाबाबत विकसीत तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्याचे प्रस्तावित आहे.





# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

## संचित प्रगती अहवाल - ३० जून २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट (PWL+Awaas+) | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक | राष्ट्रीय रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | ९८२३ | ९८२३ | ९३६९ | ९५.४% | १ | १४८ |
| २ | सिंधुदुर्ग | ५१३३ | ५१३३ | ४८८८ | ९५.२% | ३ | २२६ |
| ३ | रायगड | ९८२१ | ९८२१ | ९२७० | ९४.४% | ४ | ३४९ |
| ४ | पालघर | ३५१८८ | ३५१८८ | ३२९७८ | ९३.७% | ५ | २५१ |
| ५ | ठाणे | ९५८१ | ९५८१ | ८७९३ | ९१.८% | ७ | २८४ |
| | कोकण विभाग | ६९५४६ | ६९५४६ | ६५२९८ | ९३.९% | १ | |
| ६ | गोंदिया | ९६००२ | ९६००२ | ९१४६८ | ९५.२८% | २ | १५१ |
| ७ | गडचिरोली | ३१६३७ | ३१६३७ | २८४०९ | ८९.८०% | ८ | ३३४ |
| ८ | भंडारा | ६४३५९ | ६४३५९ | ५६२४३ | ८७.३९% | १३ | ४४० |
| ९ | नागपूर | ३६८६४ | ३६८६४ | ३२१५७ | ८७.२३% | १४ | ४८९ |
| १० | वर्धा | १८१९९ | १८१९९ | १५६४५ | ८५.९७% | १५ | ३७४ |
| ११ | चंद्रपूर | ४२६१७ | ४२६१७ | ३५९०४ | ८४.२५% | १६ | ३११ |
| | नागपूर विभाग | २८९६७८ | २८९६७८ | २५९८२६ | ८९.६९% | २ | |
| १२ | नाशिक | ८९५५९ | ८९५५९ | ८२२३७ | ९१.८२% | ६ | २५९ |
| १३ | नंदुरबार | ११८९१६ | ११८९१६ | १०६७७७ | ८९.७९% | ९ | ३७० |
| १४ | अहमदनगर | ६०६३७ | ६०६३७ | ५४४२३ | ८९.७५% | १० | ४०३ |
| १५ | धुळे | ६४७४५ | ६४७४५ | ५६७६७ | ८७.६८% | १२ | ३२० |
| १६ | जळगाव | ७८७५३ | ७८७५३ | ६२७२२ | ७९.६४% | २१ | ५१९ |
| | नाशिक विभाग | ४१२६१० | ४१२६१० | ३६२९२६ | ८७.९६% | ३ | |
| १७ | सातारा | १४८१५ | १४८१५ | १३२३१ | ८९.३१% | ११ | ३७१ |
| १८ | कोल्हापूर | १७४७८ | १७४७८ | १४५५७ | ८३.२९% | १७ | २१८ |
| १९ | पुणे | १९५५६ | १९५५६ | १५९०९ | ८१.३५% | १९ | ५६४ |
| २० | सांगली | २१६१८ | २१६१८ | १७०१४ | ७८.७०% | २२ | ५०९ |
| २१ | सोलापूर | ४८१४६ | ४८१४६ | ३६३३६ | ७५.४७% | २५ | ४९९ |
| | पुणे विभाग | १२१६१३ | १२१६१३ | ९७०४७ | ७९.८०% | ४ | |
| २२ | अकोला | ४८७७७ | ४८७७७ | ३९६९४ | ८१.३८% | १८ | ४९१ |
| २३ | अमरावती | ९३६९२ | ९३६९२ | ७४६५९ | ७९.६९% | २० | ५१४ |
| २४ | यवतमाळ | ६५०८९ | ६५०८९ | ५११४३ | ७८.५७% | २३ | ३१३ |
| २५ | वाशिम | २०१७६ | २०१७६ | १४४६२ | ७१.६८% | २७ | ३७५ |
| २६ | बुलढाणा | ४४७०६ | ४४७०६ | २९९३२ | ६६.९५% | ३२ | ३९३ |
| | अमरावती विभाग | २७२४४० | २७२४४० | २०९८९० | ७७.०४% | ५ | |
| २७ | औरंगाबाद | ३६५१५ | ३६५१५ | २७९६० | ७६.५७% | २४ | २६७ |
| २८ | हिंगोली | १८०८३ | १८०८३ | १२९९९ | ७१.८९% | २६ | २०१ |
| २९ | नांदेड | ६९२६७ | ६९२६७ | ४९१०९ | ७०.९०% | २८ | ५१२ |
| ३० | जालना | २४०५३ | २४०५३ | १६८९८ | ७०.२५% | २९ | ३१९ |
| ३१ | लातूर | २०४९३ | २०४९३ | १४०५२ | ६८.५७% | ३० | ४४६ |
| ३२ | बीड | ३५२५१ | ३५२५१ | २३७२१ | ६७.२९% | ३१ | ३४८ |
| ३३ | उस्मानाबाद | १४३९० | १४३९० | ९२९४ | ६४.५९% | ३३ | ४२६ |
| ३४ | परभणी | १९००२ | १९००२ | ११८१७ | ६२.१९% | ३४ | २२३ |
| | औरंगाबाद विभाग | २३७०५४ | २३७०५४ | १६५८५० | ६९.९६% | ६ | |
| | एकूण | १४०२९४१ | १४०२९४१ | ११६०८३७ | ८२.७४% | | |

# रमाई आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० जून २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | २०३१ | २०२९ | १९२८ | ९५.०२% | १ |
| २ | रत्नागिरी | ६६८४ | ६३५० | ५९०५ | ९२.९९% | २ |
| ३ | रायगड | २०३९ | २०२९ | १७५५ | ८६.५०% | ७ |
| ४ | पालघर | ४९८ | ४५८ | ३८७ | ८४.५०% | ११ |
| ५ | ठाणे | १२५६ | १२३५ | ९७१ | ७८.६२% | १६ |
| | कोकण विभाग | १२५०८ | १२१०१ | १०९४६ | ९०.४६% | १ |
| ६ | सातारा | १०३२८ | १०३२८ | ९४६२ | ९१.६२% | ३ |
| ७ | कोल्हापूर | १२४४३ | १२४४३ | १०८१० | ८६.८८% | ६ |
| ८ | सांगली | ८६१४ | ८५२८ | ६९९० | ८१.९७% | १२ |
| ९ | सोलापूर | १७६८९ | १७६२५ | १४३९७ | ८१.६९% | १४ |
| १० | पुणे | ९५१७ | ९४७३ | ७५६४ | ७९.८५% | १५ |
| | पुणे विभाग | ५८५९१ | ५८३९७ | ४९२२३ | ८४.२९% | २ |
| ११ | नागपूर | ८०३९ | ७९४८ | ६९६१ | ८७.५८% | ५ |
| १२ | गोंदिया | १०१२७ | ९७१४ | ८२६९ | ८५.१२% | ८ |
| १३ | भंडारा | १२४८० | १०७१७ | ९१०८ | ८४.९९% | ९ |
| १४ | वर्धा | ७५०९ | ७५०३ | ६३४९ | ८४.६२% | १० |
| १५ | गडचिरोली | ६८८० | ६७९८ | ५३१८ | ७८.२३% | १७ |
| १६ | चंद्रपूर | २२८७३ | १८२८० | १३८८६ | ७५.९६% | २२ |
| | नागपूर विभाग | ६७९०८ | ६०९६० | ४९८९१ | ८१.८४% | ३ |
| १७ | अहमदनगर | २८४३४ | २८४०९ | २५७०१ | ९०.४७% | ४ |
| १८ | जळगाव | १६७५८ | १६७३१ | १३०१० | ७७.७६% | १८ |
| १९ | नाशिक | १२३३८ | ११८११ | ९०५३ | ७६.६५% | २१ |
| २० | धुळे | ८५४९ | ८५४१ | ५९५३ | ६९.७०% | २७ |
| २१ | नंदुरबार | ३५२२ | ३४१७ | २३१८ | ६७.८४% | २८ |
| | नाशिक विभाग | ६९६०१ | ६८९०९ | ५६०३५ | ८१.३२% | ४ |
| २२ | यवतमाळ | १४३४१ | १४३३४ | ११७११ | ८१.७०% | १३ |
| २३ | वाशिम | ९१६६ | ९१६६ | ७०८५ | ७७.३०% | १९ |
| २४ | अमरावती | १४९३७ | १४७७६ | १०७५० | ७२.७५% | २४ |
| २५ | अकोला | १८०९२ | १६१३७ | ११६५४ | ७२.२२% | २५ |
| २६ | बुलढाणा | १८५५४ | १८५४० | १३०४५ | ७०.३६% | २६ |
| | अमरावती विभाग | ७५०९० | ७२९५३ | ५४२४५ | ७४.३६% | ५ |
| २७ | परभणी | १६८४१ | १६७७८ | १२९६३ | ७७.२६% | २० |
| २८ | लातूर | २६२४२ | २५९४९ | १८९४९ | ७३.०२% | २३ |
| २९ | उस्मानाबाद | २३६६४ | १६२८२ | १०३५८ | ६३.६२% | २९ |
| ३० | औरंगाबाद | २२२३३ | २१९३९ | १३८२६ | ६३.०२% | ३० |
| ३१ | जालना | १९२४६ | १८७१९ | ११४२० | ६१.०१% | ३१ |
| ३२ | बीड | २५७३५ | २५१२२ | १४८१२ | ५८.९६% | ३२ |
| ३३ | नांदेड | २१३०० | २०६७९ | ११५९१ | ५६.०५% | ३३ |
| ३४ | हिंगोली | १४२२८ | १३४५८ | ७१५३ | ५३.१५% | ३४ |
| | औरंगाबाद विभाग | १६९४८९ | १५८९२६ | १०१०७२ | ६३.६०% | ६ |
| | एकूण | ४५३१८७ | ४३२२४६ | ३२१४१२ | ७४.३६% | |

# शबरी आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० जून २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सोलापूर | ८९४ | ६५३ | ५६९ | ८७.१४% | ४ |
| २ | सांगली | ८० | ५० | ४३ | ८६.००% | ५ |
| ३ | पुणे | ६७३६ | ३०६५ | २५५९ | ८३.४९% | ७ |
| ४ | सातारा | १९७ | १८७ | १४९ | ७९.६८% | १० |
| ५ | कोल्हापूर | ६० | २५ | १३ | ५२.००% | २८ |
| | पुणे विभाग | ७९६७ | ३९८० | ३३३३ | ८३.७४% | १ |
| ६ | नाशिक | २७४५६ | १०९२७ | ९९८५ | ९१.३८% | ३ |
| ७ | नंदुरबार | ४७०४६ | १०९८० | ८५११ | ७७.५१% | १२ |
| ८ | धुळे | १८५१८ | ९४५२ | ७०५० | ७४.५९% | १५ |
| ९ | अहमदनगर | ८६४६ | ५८७४ | ३८८१ | ६६.०७% | २१ |
| १० | जळगाव | १३३३१ | ७७५९ | ४७१६ | ६०.७८% | २४ |
| | नाशिक विभाग | ११४९९७ | ४४९९२ | ३४१४३ | ७५.८९% | २ |
| ११ | सिंधुदुर्ग | ४३ | २९ | २८ | ९६.५५% | १ |
| १२ | रत्नागिरी | ३४० | २५६ | २३४ | ९१.४१% | २ |
| १३ | ठाणे | ५४३० | २१७९ | १७९९ | ८२.५६% | ८ |
| १४ | पालघर | १४३८५ | १०१४९ | ६६१७ | ६५.२०% | २२ |
| १५ | रायगड | ६६१० | ३७३५ | १९९४ | ५३.३९% | २७ |
| | कोकण विभाग | २६८०८ | १६३४८ | १०६७२ | ६५.२८% | ३ |
| १६ | अमरावती | १५२३५ | ४३३९ | ३५६१ | ८२.०७% | ९ |
| १७ | बुलढाणा | ४१९१ | १४२८ | ९५० | ६६.५३% | २० |
| १८ | यवतमाळ | १४३२२ | ८८५५ | ४९०७ | ५५.४२% | २६ |
| १९ | वाशिम | २९७० | १३४८ | ६८१ | ५०.५२% | ३० |
| २० | अकोला | ५८१५ | २३०९ | १०१७ | ४४.०५% | ३३ |
| | अमरावती विभाग | ४२५३३ | १८२७९ | ११११६ | ६०.८१% | ४ |
| २१ | जालना | २९५६ | ५२२ | ४३६ | ८३.५२% | ६ |
| २२ | लातूर | १५३८ | ६०१ | ४५६ | ७५.८७% | १३ |
| २३ | परभणी | ३८८७ | ८४३ | ६३९ | ७५.८०% | १४ |
| २४ | उस्मानाबाद | ५४९ | २८४ | २०० | ७०.४२% | १७ |
| २५ | नांदेड | ७९९१ | १३४२ | ९१० | ६७.८१% | १९ |
| २६ | औरंगाबाद | ७७८७ | ३५२३ | २११७ | ६०.०९% | २५ |
| २७ | हिंगोली | १८०३५ | ५७४२ | २९५३ | ५१.४३% | २९ |
| २८ | बीड | २२३० | ९३० | ४२३ | ४५.४८% | ३१ |
| | औरंगाबाद विभाग | ४४९७३ | १३७८७ | ८१३४ | ५९.००% | ५ |
| २९ | वर्धा | ५६९२ | ३४७२ | २७३५ | ७८.७७% | ११ |
| ३० | भंडारा | ६३३६ | ४८७९ | ३५४२ | ७२.६०% | १६ |
| ३१ | गडचिरोली | १०९५१ | ६८४८ | ४६८८ | ६८.४६% | १८ |
| ३२ | गोंदिया | ५५९९ | ३८०५ | २३६७ | ६२.२१% | २३ |
| ३३ | चंद्रपूर | २३१८२ | ११६०४ | ५१९४ | ४४.७६% | ३२ |
| ३४ | नागपूर | १३१८८ | ६२४७ | २३२४ | ३७.२०% | ३४ |
| | नागपूर विभाग | ६४९४८ | ३६८५५ | २०८५० | ५६.५७% | ६ |
| | एकूण | ३०२२२६ | १३४२४१ | ८८२४८ | ६५.७४% | |

# पारधी आवास योजना
## संचित प्रगती अहवाल - ३० जून २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धुळे | ४३२ | ४३२ | ४१८ | ९६.७६% | ९ |
| २ | अहमदनगर | १९८ | १९८ | १८२ | ९१.९२% | १३ |
| ३ | जळगाव | ५७० | ५६६ | ४९४ | ८७.२८% | १७ |
| ४ | नाशिक | १४३ | १३७ | १०४ | ७५.९१% | २३ |
| ५ | नंदुरबार | १० | ० | ० | ०.००% | २९ |
| | नाशिक विभाग | १३५३ | १३३३ | ११९८ | ८९.८७% | १ |
| ६ | हिंगोली | ३५ | ३५ | ३५ | १००.००% | १ |
| ७ | लातूर | १७ | १३ | १३ | १००.००% | ३ |
| ८ | नांदेड | ५० | ४२ | ४२ | १००.००% | ४ |
| ९ | परभणी | ५६ | ५६ | ५६ | १००.००% | ५ |
| १० | बीड | ९२ | ८६ | ७८ | ९०.७०% | १४ |
| ११ | औरंगाबाद | ५७ | ५१ | ४४ | ८६.२७% | १८ |
| १२ | उस्मानाबाद | २४७ | २४७ | २०५ | ८३.००% | २० |
| १३ | जालना | ३८ | ३६ | २८ | ७७.७८% | २१ |
| | औरंगाबाद विभाग | ५९२ | ५६६ | ५०१ | ८८.५२% | २ |
| १४ | वाशिम | ६४ | ६४ | ६२ | ९६.८८% | ८ |
| १५ | बुलढाणा | ३७१ | ३७१ | ३५३ | ९५.१५% | ११ |
| १६ | अमरावती | ४५१ | ४४४ | ४१३ | ९३.०२% | १२ |
| १७ | अकोला | ३७४ | ३७३ | ३३८ | ९०.६२% | १५ |
| १८ | यवतमाळ | ५९४ | ५९३ | ४५७ | ७७.०७% | २२ |
| | अमरावती विभाग | १८५४ | १८४५ | १६२३ | ८७.९७% | ३ |
| १९ | कोल्हापूर | ७ | ७ | ७ | १००.००% | २ |
| २० | सातारा | २४ | २४ | २४ | १००.००% | ६ |
| २१ | सोलापूर | २३१ | २०२ | १९४ | ९६.०४% | १० |
| २२ | सांगली | ३८ | २६ | २२ | ८४.६२% | १९ |
| २३ | पुणे | १८८ | १७४ | १२७ | ७२.९९% | २४ |
| | पुणे विभाग | ४८८ | ४३३ | ३७४ | ८६.३७% | ४ |
| २४ | वर्धा | ५० | ५० | ४९ | ९८.००% | ७ |
| २५ | नागपूर | ४८ | ४८ | ४२ | ८७.५०% | १६ |
| २६ | चंद्रपूर | ३५ | ३२ | १७ | ५३.१३% | २५ |
| | नागपूर विभाग | १३३ | १३० | १०८ | ८३.०८% | ५ |
| २७ | रायगड | २ | ० | ० | ०.००% | ३१ |
| २८ | रत्नागिरी | १ | ० | ० | ०.००% | ३२ |
| २९ | सिंधुदुर्ग | १ | ० | ० | ०.००% | ३३ |
| | कोकण विभाग | ४ | ० | ० | ०.००% | ६ |
| | एकूण | ४४२४ | ४३०७ | ३८०४ | ८८.३२% | |

# आदिम आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० जून २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | ६६ | ५० | ४९ | ९८.००% | १ |
| २ | पालघर | ११३१ | ११२८ | ९४९ | ८४.१३% | २ |
| ३ | रायगड | १३९४ | १३९४ | ११६५ | ८३.५७% | ३ |
| ४ | ठाणे | १५७८ | १५७१ | १२६८ | ८०.७१% | ५ |
| ५ | रत्नागिरी | ११ | ११ | ६ | ५४.५५% | ८ |
| | कोकण विभाग | ४१८० | ४१५४ | ३४३७ | ८२.७४% | १ |
| ६ | नांदेड | ४१९ | १८१ | १३२ | ७२.९३% | ६ |
| ७ | औरंगाबाद | ० | ० | ० | ०.००% | १६ |
| ८ | बीड | ० | ० | ० | ०.००% | १७ |
| | औरंगाबाद विभाग | ४१९ | १८१ | १३२ | ७२.९३% | २ |
| ९ | गडचिरोली | १७७८ | १७४९ | १४४० | ८२.३३% | ४ |
| १० | चंद्रपूर | ७२३ | ६०५ | ३६१ | ५९.६७% | ७ |
| ११ | वर्धा | ३९६ | २४८ | ८८ | ३५.४८% | १० |
| | नागपूर विभाग | २८९७ | २६०२ | १८८९ | ७२.६०% | ३ |
| १२ | यवतमाळ | ४७८४ | ४५०३ | २०८७ | ४६.३५% | ९ |
| | अमरावती विभाग | ४७८४ | ४५०३ | २०८७ | ४६.३५% | ४ |
| १३ | नाशिक | ९८ | ३७ | १२ | ३२.४३% | ११ |
| | नाशिक विभाग | ९८ | ३७ | १२ | ३२.४३% | ५ |
| १४ | पुणे | ७५ | ७१ | १५ | २१.१३% | १२ |
| | पुणे विभाग | ७५ | ७१ | १५ | २१.१३% | ६ |
| | एकूण | १२४५३ | ११५४८ | ७५७२ | ६५.५७% | |

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० जून २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | ९५ | ७३ | ६२ | ८४.९% | ३ |
| | कोकण विभाग | ९५ | ७३ | ६२ | ८४.९% | १ |
| २ | सोलापूर | ४ | ४ | ३ | ७५.०% | ४ |
| ३ | कोल्हापूर | ६५ | ६५ | ४० | ६१.५% | ५ |
| ४ | सातारा | १०८ | १०८ | ६५ | ६०.२% | ६ |
| ५ | पुणे | २० | ० | ० | ०.०% | १३ |
| | पुणे विभाग | १९७ | १७७ | १०८ | ६१.०२% | २ |
| ६ | लातूर | १० | १० | १० | १००.००% | २ |
| ७ | उस्मानाबाद | ५१८ | ३७९ | २१८ | ५७.५२% | ७ |
| | औरंगाबाद विभाग | ५२८ | ३८९ | २२८ | ५८.६१% | ३ |
| ८ | अमरावती | ५०७ | ३४१ | १५७ | ४६.०४% | ८ |
| ९ | यवतमाळ | ९५८ | १४० | ३३ | २३.५७% | १० |
| | अमरावती विभाग | १४६५ | ४८१ | १९० | ३९.५०% | ४ |
| १० | गोंदिया | २० | २० | २० | १००.००% | १ |
| ११ | नागपूर | १६ | ८ | २ | २५.००% | ९ |
| १२ | चंद्रपूर | २१३८ | १९१२ | १२ | ०.६३% | ११ |
| | नागपूर विभाग | २१७४ | १९४० | ३४ | १.७५% | ५ |
| १३ | अहमदनगर | २० | २० | ० | ०.००% | १२ |
| | नाशिक विभाग | २० | २० | ० | ०.००% | ६ |
| | एकूण | ४४७९ | ३०८० | ६२२ | २०.१९% | |

# प्रधानमंत्री आवास योजनेमुळे घरकुल स्वप्नपूर्ती

म्हसेपठार गावातील तालुका कळमेश्वर जिल्हा नागपूर येथील रहीवाशी श्री. धनराज ऋषीया यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुलाचा लाभ मिळाला आहे.

यापूर्वी श्री. धनराज ऋषीया यांचे घर कुडा मातीचे मोडकळीस आले होते. त्यांची परिस्थिती अत्यंत हालाखीची असल्याने घर बांधण्याचे किंवा दुरूस्तीचे त्यांच्या डोक्यात विचार सुद्धा येत नव्हता. अत्यंत गरिब परिस्थितीमुळे रोज मजुरी करून जे काही मिळकत मिळेल त्याने घर चालविणे असा दिनक्रम सुरु होता. त्यांच्याकडे कमी शेती असल्याने शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून काहीही शिल्लक राहत नसल्याने घराचे बांधकाम करणे शक्य नव्हते. त्यांच्या घराची इतकी वाईट अवस्था झाली होती की, कच्च्या, कुडाच्या घरात दिवस काढणे खूप कठीण झाले होत. घराचे छत पावसाळ्याच्या पाण्यामुळे सतत गळत होते. संपूर्ण घरात पाणी शिरत होते. कित्येकदा संपूर्ण रात्र जागून काढावी लागत होती. त्यांची आर्थिक परिस्थती अशी होती की, घराच्या उदरनिर्वाहामुळे पैसा शिल्लक राहत नव्हता. त्यांच्या या अशा परिस्थितीमुळे घराचे बांधकाम करणे त्यांना फारच कठीण झाले होते.

अशातच प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सन २०२१-२२ मध्ये संपूर्ण जिल्ह्याला उद्दिष्ट प्राप्त झाले त्यानंतर तालुक्याला उद्दिष्ट प्राप्त झाले. त्यानुसार ग्रामपंचायत म्हसेपठार कडून घरकुलांचे प्रस्ताव तयार करून पंचायत समिती कळमेश्वर कार्यालयात पाठविण्यात आले. श्री. धनराज ऋषीया यांचे नाव घरकुलासाठी पात्र झाले.

श्री. धनराज ऋषीया यांनी आवश्यक कागदपत्राची पुर्तता करताच घरकुलाचा करारनामा करून घरकुल मंजुर करण्यात आले. घरकुल मंजुर होताच पंचायत समिती स्तरावरून दि. ३० मार्च, २०२२ रोजी त्यांच्या बँक खाती घरकुलाचा प्रथम हप्ता रक्कम रु.१५,०००/- जमा करण्यात आला. पहिला हप्ता मिळताच श्री. धनराज ऋषीया यांनी घरकुल बांधकामास सुरुवात केली. जोत्यापर्यंत बांधकाम पूर्ण झाल्यावर त्याचे फोटो काढून ग्रामसेवकाच्या स्वाक्षरीने द्वितीय हप्ता मागणी प्रस्ताव पंचायत समितीला सादर केला. ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. अनिकेत कडू यांनी घरकुलाची पाहणी करून द्वितीय हप्ता रक्कम रूपये ४५,०००/- दिनांक १७ जून, २०२२ रोजी श्री.धनराज ऋषीया यांच्या बँक खाती जमा करण्यात आला. त्यांनतर त्यांनी लिंटेल लेव्हलपर्यंत बांधकाम पूर्ण केले. यासोबतच त्यांचे मनरेगा अंतर्गत मजुरीचे मस्टर रोजगार सेवकाकडून काढण्यात आले.

श्री. धनराज ऋषीया यांचे घरकुलाचे बांधकाम लिंटेल लेव्हलपर्यंत पूर्ण झाल्यावर तृतीय हप्ता मागणी प्रस्ताव फोटोसह सादर करताच पंचायत समिती स्तरावरून तृतीय हप्ता रक्कम रु. ४०,०००/- दिनांक ०३ सप्टेबर, २०२२ त्यांच्या बँक खाती जमा करण्यात आला. त्यानंतर त्यांनी घरावर स्लॅब टाकून शौचालयासह मजबूत घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले. श्री. धनराज ऋषीया यांनी घरकुल बांधकाम पूर्ण झाल्याने अंतिम हप्ता मागणी प्रस्ताव शौचालय व घरकुल फोटोसह पंचायत समितीकडे सादर केला. त्यानुसार ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी घरकुलाची पहाणी करून अंतिम हप्ता रक्कम रु. २०,०००/- दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी श्री. धनराज ऋषीया यांच्या बँक खाती जमा करण्यात आला.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुल बांधकाम करण्यासाठी मिळणारे अनुदान रक्कम रू. १,२०,०००/- व रोजगार हमी योजनेतून मिळणारे अनुदान रक्कम रु. १८,०००/- श्री. धनराज ऋषीया यांना प्राप्त झाल्यामुळे ते पक्के घरकुल बांधकाम पूर्ण करू शकले.

सरपंच, ग्रामसेवक तसेच पंचायत समिती कळमेश्वर येथील गट विकास अधिकारी, घरकुल योजनेचे अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या प्रयत्नातून माझे स्वप्नातील घरकुल पूर्ण झाले व यामुळे माझे जीवनमान उंचावले असून मी अत्यंत आनंदी आहे. याकरीता मी शासनाचे खुप खुप आभारी असल्याची प्रतिक्रिया श्री. धनराज ऋषीया यांनी व्यक्ती केली.





# शासकीय योजनेमुळे पक्क्या घराची निर्मिती

यवतमाळ जिल्ह्यातील पंचायत समिती घाटंजी अंतर्गत हिवरदरा ग्रामपंचायती मध्ये श्री. लोभेश्वर करनु वरतकर राहत असून त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची आहे. छोटे गाव आणि गावात नागरी सुविधा कमी असल्याने महाराष्ट्र राज्याच्या तुलनेत गावात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे.

अशा या हिवरदरा गावचे श्री. लोभेश्वर करनु वरतकर रहिवासी आहेत. यापूर्वी त्यांचे घर कौलारू होते. पावसाळ्यात छत गळतीचा व उन्हाळ्यात उष्णतेचा त्यांना फार त्रास सहन करावा लागत होता. त्यांची मनापासून इच्छा होती की, आपलेही पक्के घर असावे. परंतु केवळ इच्छाशक्तीने काहीही होत नसून त्याकरीता पैसा लागतो, हे त्यांना चांगल्या प्रकारे माहिती होते.

जवळ जवळ पक्के घर बांधण्याची आशा सोडलेले श्री. लोभेश्वर करनु वरतकर यांना एक दिवस त्यांच्या ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण बाबत माहिती दिली. या योजनेचे निकष व आवश्यक कागदपत्र या बाबत ग्रामसेवक यांनी सविस्तर समजून सांगितले. त्यानुसार श्री. लोभेश्वर करनु वरतकर यांनी आवश्यक कागदपत्राची पूर्तता करून त्यांचा घरकुल मागणी प्रस्ताव तयार करून ग्रामसभेत ठराव मंजूर करण्यात आला. ग्रामपंचायतीने विनाविलंब प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत त्यांचा घरकुलाचा प्रस्ताव पंचायत समिती घाटंजी कार्यालयाकडे सादर केला. बघता बघता त्यांचे घरकुल मंजूर झाले. आता आपलं पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण होईलच असे श्री. लोभेश्वर करनु वरतकर यांना वाटू लागले.

श्री. लोभेश्वर करनु वरतकर यांचे घरकुल मंजूर झाल्यानंतर घाटंजी पंचायत समिती कार्यालयाने त्यांना आधार कार्ड, बँक पासबुक, जॉब कार्ड व इतर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यास सांगितले. त्यानुसार श्री. लोभेश्वर करनु वरतकर यांनी आवश्यक सर्व कागदपत्राची पूर्तता पंचायत समिती कार्यालयाकडे करताच पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांनी तात्काळ घरकुलाचा पहिला हप्ता श्री. लोभेश्वर करनु वरतकर यांच्या बँक खाती जमा केला.

श्री. लोभेश्वर करनु वरतकर यांना घरकुलाचा पहिला हप्ता मिळताच ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. निलेश माणगावकर यांनी घरकुल बांधकामाचे ले-आउट देवून बांधकाम साहित्य खरेदी व घरकुल बांधकामाबाबत मार्गदर्शन केले. श्री. लोभेश्वर करनु वरतकर यांनी घरकुलाच्या बांधकामास सुरुवात केली. त्यांच्या घरकुल बांधकामाच्या प्रगतीनुसार पंचायत समितीस्तरावरून सर्व हप्ते टप्प्या टप्प्याने श्री.लोभेश्वर करनु वरतकर यांच्या बँक खाती जमा करण्यात आले. श्री. लोभेश्वर करनु वरतकर यांना घरकुल बांधकामाच्या टप्प्यानुसार प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधून एकुण रक्कम रु. १,२०,०००/- इतके अर्थसहाय्य मिळाले. त्यासोबत शासनाच्या विविध योजनांच्या कृती संगमनातून श्री. लोभेश्वर करनु वरतकर यांना घरकुलासह स्वच्छ भारत मिशन ग्रामीण मधून शौचालयासाठी रक्कम रु.१२,०००/- मनरेगांमधून रक्कम रु. १८,०००/- असे एकूण रक्कम रु. १,५०,०००/- शासनाचे अर्थसहाय्य प्राप्त झाले. त्यामुळे त्यांचे पक्के घरकुल शौचालयासह पूर्ण झाल्याने उघड्यावर जाण्याचा प्रश्न मिटला.

श्री. लोभेश्वर करनु वरतकर यांनी पक्के घराचे स्वप्न पाहिले होते ते प्रत्यक्षात पूर्ण झाले यासाठी त्यांनी ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य, ग्रामसेवक व गावातील सहकारी ग्रामस्थांचे आभार मानले. तसेच घरकुल बांधकामासाठी वेळोवेळी मार्गदर्शन केले त्याकरीता ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. निलेश माणगावकर यांचे आभार मानले. घरकुल मंजुरी पासून तर हप्ते वितरणापर्यंत मोलाची मदत केल्याबद्दल पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व तालुका ऑपरेटर यांचे विशेष आभार मानले. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण या जनकल्याणकारी योजनेसाठी श्री.लोभेश्वर करनु वरतकर शासनाचे आणि माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले.





# पालात राहणारे गेले हक्काच्या पक्क्या घरात

ऊन, पाऊस, वादळ, वारा, विंचूकाटा या पासून संरक्षणासाठी सर्वांनाच सुरक्षित व हक्काचे घर हवे असते. अशा घराच्या निर्मितीसाठी सर्वजन कार्यक्रम प्रयत्नशिल असतात कारण चांगल्या घरात सदैव आनंद वसतो. मात्र सदा सर्वदा कुडाच्या पालाच्या घरात राहणाऱ्यानी पक्क्या घराचे स्वप्न पहाणं म्हणजे जरा कठीणचं!



मात्र असा चमत्कार घडला आहे. दिनांक २९ जुन, २०२३ आषाढी एकादशीचे निमित्त साधून हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यामधील बन या ग्रामपंचायतीचे रहिवासी श्री. मनु दगडू पवार यांचे घरकुलाचा गृहप्रवेश हिंगोली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजयजी दैणे यांच्या शुभहस्ते व जिल्हा ग्राम विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. नामदेवजी केंद्रे यांच्या प्रमुख उपस्थित मोठ्या थाटात करण्यात आला.

अत्यंत हालाखीची परिस्थिती असणारे व पालात वास्तव्य करणारे पारधी समाजातील श्री. मनू दगडू पवार यांची एक वर्षांपूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची बन येथील आरोग्य उपकेंद्रांमध्ये भेट झाली. यावेळी श्री. मनू दगडू पवार यांनी 'मी पालामध्ये राहतो, मला घरकुल उपलब्ध करून द्यावे' अशी विनंती मुख्य कार्यकारी यांना केली. मात्र हा विषय एवढ्यावर थांबला नाही तर मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. दैने यांनी सबंधित विभाग प्रमुखांना बोलवून या विषयी तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने तातडीने कार्यवाही करून संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांना श्री. मनू दगडू पवार यांचा घरकुल मागणी प्रस्ताव सादर करण्याचे सूचित केले. शबरी आवास योजने अंतर्गत प्रस्ताव जिल्हास्तरावर आल्यानंतर श्री. मनू दगडू पवार यांचे घरकुल मंजूर करून पहिला हप्ता त्वरीत वितरीत करण्यात आला.

श्री. मनू दगडू पवार यांनाही घरकुलाची खुप गरज होती त्यामुळे त्यांनी घरकुलाचे काम अत्यंत गतिने पूर्ण करण्यास सुरूवात केली. त्यांच्या घरकुलाच्या टप्प्यानुसार त्यांना घरकुलाचे सर्व हप्ते वेळेवर मिळाल्याने श्री. मनू दगडू पवार यांनी घरकुल बांधकाम अवघ्या दोन महिन्यातच पूर्ण केले.

श्री. मनू दगडू पवार यांनी फक्त दोन महिन्यात घरकुल बांधकाम पूर्ण केल्याची बातमी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कळताच आपण केलेले कामाचे चीज झाले व फार मोठे समाधान लाभल्याची प्रतिक्रीया त्यांनी दिली. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.संजयजी दैणे यांनी सपत्नीक श्री. मनू दगडू पवार यांच्या घरकुलास भेट देऊन लाभार्थींचा गृहप्रवेश केला. हक्काचे पक्के घरकुल दिल्याबद्दल श्री. मनू दगडू पवार यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. दैणे यांचे मनापासून आभार मानले.

श्री. मनू दगडू पवार यांच्या गृहप्रवेश कार्यक्रमाप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.संजयजी दैणे यांच्यासह जिल्हा ग्राम विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. नामदेव केंद्रे, सेनगाव पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. माधव कोकाटे, विस्तार अधिकारी श्री. देशमुख, डॉ. इंदिरा जामने, ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक श्री. सुरेश काळे, सरपंच श्रीमती अर्चना शेजुळ, डॉ. दिनेश नागरे, उपसरपंच श्रीमती ज्योती गजानन वाघ, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. एकनाथ वाघ, श्री. कृष्णा खिंडरे, श्री. अटकोरे, युवराज देशमुख, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.






# आदिवासी कुटुंबांसाठी गृहसंकुलाची उभारणी

श्रीरामपूर तालुक्यातील मौजे मालुंजा बु. गावाची २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ३७४४ असून सुमारे ८४२ कुटुंबे आहेत. अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपुर तालुक्यामधील मांलुजा बु. या गावात आदिवासी समाजाचे २८ गरीब कुटुंबे प्रवरा नदी काठी झोपड्या, पत्राचे शेड व दगड मातीचे कच्चे घर या मध्ये अतिक्रमण करून राहत होते. या ठिकाणी मुलभूत सुविधा नसल्यामुळे व पावसाळ्यात नदीला पूरस्थिती निर्माण झाल्यावर या लोकांच्या घरात नदीचे पाणी जात असल्यामुळे लोकांना हाल अपेष्ठा सहन कराव्या लागत होत्या. अशा प्रसंगी ते लोक गावातील मंदिर, शाळा या ठिकाणी आश्रय घेत. हे लोक शेतमजुरी, बांधकाम मजुरी, उसतोड मजुरी कामाला जाऊन त्यांचा उदरनिर्वाह करतात. या कठीण परिस्थिती पासून सुटका व्हावी यासाठी त्यांनी ग्रामपंचायती कडे घरकुलाची मागणी केली.

त्यानुसार पंचायत समिती श्रीरामपुर व ग्रामपंचायत मालुंजा बु येथील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी या आदिवासी समाजातील लाभार्थ्यांच्या वस्तीमध्ये जाऊन बैठका घेवून त्यांची घरकुल प्रतीक्षा यादीमध्ये नाव समाविष्ट असल्याचे कळविले. तसेच केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण बाबत लाभार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. या समाजातील काही लाभार्थी काम धंदा करण्यासाठी उसतोडीसाठी, वीटभट्टी कामासाठी बाहेर गावी गेलेले होते. यांच्याकडे आवश्यक कागदपत्रही नसल्याने या लाभार्थीसाठी आधारकार्ड, बँक पासबुक व इतर कागदपत्र तयार करण्यसाठी लाभार्थी मेळावा घेवून कागदपत्राची पुर्तता करण्यात आली.

हे सर्व लाभार्थी भूमिहीन असल्यामुळे मुख्य कार्यकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांच्या आदेशान्वये भूमी शोध अभियानांतर्गत गावामध्ये जिल्हा परिषद अहमदनगर यांच्या मालकीचे गट नं १०४ या जागेचा भूखंड या लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता देण्यात आला. या सर्व लाभार्थ्यांसाठी या जागेवर प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत गृहसंकुल उभारण्याचे ठरविले.

त्यानुसार या सर्व **२८** लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत रक्कम रू.१,२०,०००/- रुपये अनुदानाचा प्रती लाभार्थी देण्यात आले. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सर्व लाभार्थ्यांना प्रत्येकी रक्कम रू. १२,०००/- शौचालय बांधकामासाठी प्रोत्साहनपर अनुदान देण्यात आले. महिला स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून या सर्व २८ कुटुंबातील महिलाच्या आर्थिक प्रगतीसाठी व यांचे जीवनमान उंचावण्यासाठी ३ बचत गट स्थापन करण्यात आले.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत मेरापथ एज्युकेशन लिमिटेड यांच्या मार्फत या सर्व लाभार्थींना गवंडी प्रशिक्षण देण्यात आले व गवंडी प्रशिक्षण अंतर्गत प्रती मजुर रक्कम रू. १५,७५०/- मजुरी देण्यात आली. तसेच मेरापथ एज्युकेशन लिमिटेड सीएसआर फंडातून स्ट्रीट लाईट फिटिंगची कामे पूर्ण करण्यात आली. या गृहसंकुला अंतर्गत घरकूलांना सुबक रंगरंगोटी करण्यात आली आहे. घरकूलांना भोवती विविध झाडे लावुन बाग तयार करण्यात आली आहे.

अशा प्रकारे केंद्र शासन, राज्य शासन व सीएसआर फंड, इ. च्या अर्थसहाय्यातून व विविध योजनांच्या कृतीसंगमातून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत २८ घरकुलांचे बांधकामे पूर्ण करून सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या व या गृहसंकुलाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

या घरकुल वसाहतीमध्ये रस्ते, भूमिगत गटार, लहान मुलांसाठी अंगणवाडी , प्राथमिक शाळा, सामाजिक सभागृह, उद्यान व खेळ साहित्यासह क्रीडांगण करावयाचे प्रस्तावित आहे. त्याचप्रमाणे विरंगुळा केंद्र, पिण्याच्या शुद्ध पाण्यासाठी पाण्याची टाकी यासारखी इतरही कामे प्रस्तावीत निधीची उपलब्धता होताच पुर्ण करण्याचे नियोजित आहे.





# नियतीशी लढा देवून उभारले घरकुल

सातारा जिल्ह्यामधील पाटण तालुक्यातील मारूल तर्फ पाटण या गावातील घरकुलाची ही गोष्ट आहे. कोयना नदीच्या काठावर, डोळ्याचे पारणं फेडेल असं निसर्गरम्य वातावरणात हे गाव वसलेलं आहे. अशा या सुंदर गावाचे रहिवासी श्री. मारूती महादेव वाईकर हे आहेत. पत्नी श्रीमती गंगूबाई, मुलगा श्री. रामचंद्र, सून श्रीमती सुहासीनी, नातू श्री. ओमकार व श्री. हृषिकेष अस हसतखेळत कुटूंब साध्या कूडामातीच्या घरात राहात होतं. सर्व कुटुंब एकजुटीने राहात असल्याने सर्व कुटुंबीयांची एकच इच्छा होती की, आपलही पक्क घर असाव. त्यादृष्टीने त्यांची तशी सर्व तयारी सुरूही होती. मात्र नियतीचा फेरा फिरला आणि सून श्रीमती सुहासीनी नातेवाईकांनी बरोबर नेल म्हणून केदारनाथला गेली अन त्यांचे तिथे २०१३ साली निधन झाले. पत्नीच्या दुःखात हरवलेला श्री. रामचंद्र २०१५ साली कसा देवाघरी निघून गेला कळलेच नाही.



एका मागे एक अशा दोन दुर्देवी घटनातून श्री.महादेव वाईकरांनी स्वतःला सावरत दोन नातवांना हाताशी धरून ते संकटाचा सामना करू लागले. रोजीरोटी अन कमाई करीता थोरला नातू श्री. ओमकार पनवेलला गेला. सगळ स्थिरस्थावर होत आहे अस वाटत होतं. श्री. मारूती महादेव वाईकर यांना आता थोडं स्थिरावल्यासारखं वाटलं पण ते नियतीला मान्य नसावं. श्री. ओमकार पनवेलला कामानिमित्त गेला मात्र तो कधीच परत आला नाही. श्री. ओमकार याचा सन २०२० साली अपघाती निधन झाल. आभाळ फाटावं



एवढा मोठा दुःखाचा डोंगर श्री. मारूती महादेव वाईकर यांच्या कुटुंबावर कोसळला आणि सगळीकडे अंधाराच दिसू लागला. श्री. मारूती महादेव वाईकर यांनी परत एकदा हिंमत करून कुटूंबातील नातू हृषिकेष आणि पत्नी गंगूबाई यांच्यासाठी जगण्याचा निर्णय घेतला आणि पुढील वाटचाल सुरू केली.

श्री. मारूती महादेव वाईकर यांचे कुटूंब सामाजिक बांधिलकीतून काम करीत असलेले ग्रामीण गृहनिर्माण अभियंता जगदीशसिंह पाटणकर यांचे निर्दशनास आले. श्री. पाटणकर यांनी त्यांचा घरकुलाचा प्रस्ताव तयार करून मंजुरीकरीता पाठविला आणि श्री. मारूती महादेव वाईकर यांना रमाई आवास योजनेंतर्गत प्रस्ताव मान्य होवून घरकुल मंजूर झाले. श्री. मारूती महादेव वाईकर यांची आर्थिक परिस्थितीचा विचार करता समाजातील दानशूर लोकांकडून श्री.जगदीशसिंह पाटणकर यांनी रोख रक्कम व बांधकाम साहित्य वस्तूरूपात मदत मिळवून दिली. श्री. मारूती महादेव वाईकर यांना रमाई आवास योजनेंतर्गत घरकूल अनुदानासह, रोजगार हमी योजनेंतर्गत मजूर अनुदान, स्वच्छ भारत मिशनअंतर्गत शौचालय अनुदान व इतर शासकीय योजनांचे लाभ देण्यात आले. याकामी सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक, पाटण पंचायत समितीचे गट विकास अधिकारी व सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून मोलाचं सहकार्य लाभले.

मात्र श्री. मारूती महादेव वाईकर यांचे दुर्दैव संपत नव्हत या घरकूलाच काम चालूच असताना सौ.गंगूबाई यांना अर्धांग वायूचा झटका आला. तरीही नियतीशी लढा देत श्री.महादेव वाईकर यांनी कुटुंबियांच्या स्वप्नातील पक्क घरकूल उभारलं.

श्री. मारूती महादेव वाईकर यांच्या विषयी कळताच राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीणचे प्रशिक्षण समन्वयक (IEC) श्री. दिनेश मोवळे यांनी पुणे विभागीय प्रोग्रामर श्री. आप्पासाहेब जाधव यांच्यासह श्री. मारूती महादेव वाईकर यांच्या घरकुल बांधकामास भेट देवून त्यांच्या कुटुंबियांचे मनोबल वाढविले.



# शासनाची जनकल्याणकारी योजना घरकुल योजना

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील श्री. विश्राम बाबाजी चव्हाण हे तेरवणमेढे गावचे रहिवाशी असून गावातच मोलमजूरीची कामे करून त्यांचा उदरनिर्वाह करीत होते. त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत वाईट होती. ते राहत असलेले घर कुडामातीचे व मोडकळीस आले होते. घरात शौचालय नसल्याने ते व त्यांचे कुटुंबीय सार्वजनिक शौचालयाचा वापर करायचे. घराची वाईट अवस्था असल्यामुळे त्यांना बाहेरगावी रोजगारासाठी जाता येत नव्हते किंवा त्यांना अपेक्षित कामही मिळत नव्हते. श्री. विश्राम बाबाजी चव्हाण यांनी आपलेही पक्के घरकुल व्हावे, यासाठी प्रयत्न सुरू केले.

श्री. विश्राम बाबाजी चव्हाण यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण बाबत ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांनी माहिती दिल्यानंतर क्षणाचाही विलंब न करता त्यांनी या योजनेचा लाभ घेण्याचे ठरविले. त्याकरीता त्यांनी ग्रामपंचायतीकडे घरकुल मागणी अर्ज केला. त्यानुसार ग्रामपंचायतीने ग्रामसभेचा ठराव घेऊन श्री. विश्राम बाबाजी चव्हाण यांचा प्रस्ताव पंचायत समिती कार्यालयाकडे पाठविला. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत आवास प्लस यादीत श्री. विश्राम बाबाजी चव्हाण यांचे नाव आले. प्राधान्यक्रम यादीनुसार सन २०२०-२१ मध्ये त्यांचा प्रस्ताव पंचायत समिती दोडामार्ग येथे सादर करण्यात आला. सदरचा प्रस्ताव शासनमार्फत मंजूर होवून झाल्यानंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रशासकीय मंजूरी आदेश क्रमांक १५७, दि.१८/०२/२०२२ ने मंजूरी मिळाली.

श्री. विश्राम बाबाजी चव्हाण यांना घरकुल मंजूर झाल्याचे कळताच त्यांच्या आनंदाला सीमा उरली नाही. घरकुल मंजूर होताच पंचायत समितीस्तरावर पहिला हप्ता श्री. विश्राम बाबाजी चव्हाण यांच्या बँक खाती जमा करण्यात आला. श्री. विश्राम बाबाजी चव्हाण यांनी सदरचे घरकूल शौचालयासह बांधून पूर्ण केले. घरकूल बांधकामासाठी लागणारे शासनाचे अनूदान त्यांना वेळोवेळी प्राप्त झाले. तसेच महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत लाभार्थ्यांला मजूरीचे अनुदान देखील प्राप्त झाले. यामुळे त्यांना घरकुल बांधकामाकरीता अधिकचे अर्थसहाय्य मिळाल्याने ते आनंदी झाले.

माझे जुने राहते घर मोडकळीस आलेले होते. यावेळी ग्रामपंचायतीमार्फत गटविकास अधिकारी पंचायत समिती दोडामार्ग यांचेशी संपर्क साधुन योजनेची माहिती घेऊन आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केली. माझ्या घरची परिस्थिती गरिबीची असून मला अपत्य नसलेने मी व माझी बायको आम्हा दोघांना घरकुलाची अत्यंत आवश्यकता होती. पावसामुळे माझे जुने घर गळत होतं आणि अक्षरशः मोडकळीस आलेले होते. माझे पक्के घर झाल्याने मला स्थिरता आली. एकुणच पक्या घरकुलामुळे माझा आत्मविश्वास वाढल्याने मला पुर्वीपेक्षा जोमाने काम धंदा करण्याची उमेद निर्माण झाली आहे. माझ्या पक्या घराचा प्रश्न सुटलेने मला घरापासून २ ते ३ कि.मी परिसरात मोलमजूरी मिळत आहे. त्यामुळे माझ्या उदरनिर्वाहाचा प्रश्नही सुटला आहे. त्यामुळे मी माझ्या बायकोचे पालन पोषण करण्यास सक्षम झालो आहे. या बाबत मला गटविकास अधिकारी पंचायत समिती दोडामार्ग व त्यांच्या यंत्रणेने वेळोवेळी आवश्यक ते सहकार्य केले. त्यासाठी त्यांचा आभारी असल्याची प्रतिक्रीया श्री. विश्राम बाबाजी चव्हाण यांनी दिली.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत शासनाने आमच्या राहत्या घराचे स्वप्न पुर्ण केल्याबद्दल शासनाचे तसेच पंचायत समिती दोडामार्गचे गट विकास अधिकारी श्री.वासुदेव महादेव नाईक व त्यांच्या टिमचे मी आभार मानतो. गरीबांच्या कल्याणासाठी शासन अशा योजना राबवतात आम्ही शतशः त्यांचे ऋणी आहोत. अशा कल्याणकारी योजनांमुळे माझ्या सारख्या लाखो गरिब, गरजु व बेघर कुटुंबांना हक्काचा निवारा मिळत आहे. याकरीता सर्वांचे मनापासून आभार मानत आम्ही घरकुल मिळाल्याने आनंदी आहोत असे श्री. विश्राम बाबाजी चव्हाण यांनी सांगितले.






17.948844
e: 74.916267
: 503.37±7 m
r: 10.7 m
248° (W)
3° (1.5°)
10-2023 10:33
kul pradhanmantri















## महाआवास घरकूल योजनेअंतर्गत कळमनुरी पं.स.जिल्हास्तरीय प्रथम पुरस्कार

देशोन्नती वृत्तसंकलन...

■ तर केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत तिसरा पुरस्कार

**आखाडा बाळापुर :** महा आवास अभियान- ग्रामीण सन २०२१-२२ अंतर्गत पंचायत समिती कळमनुरीस राज्य पुरस्कृत घरकुल योजनेंतर्गत सर्वोत्कृष्ट कामाबाबत जिल्हास्तरीय प्रथम पुरस्कार कृषीमंत्री महाराष्ट्र राज्य व पालकमंत्री अब्दुल सत्तार हिंगोली यांच्या हस्ते वितरित करण्यात आला. तसेच केंद्र पुरस्कृत घरकुल योजनेंतर्गत सर्वोत्कृष्ट कामकाजा बाबत प्रधान मंत्री आवास योजनामध्ये जिल्हास्तरीय तृतीय पुरस्कार मिळाला आहे. तसेच सर्वोत्कृष्ट क्लस्टर अंतर्गत येहळेगाव तु.या गणास जिल्हास्तरीय तृतीय पुरस्कार मिळाला व राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत अंतर्गत देवजना ता कळमनुरी जिल्हास्तरीय प्रथम पुरस्कार वितरण करण्यात आला.

यावेळी खासदार हेमंत पाटील, आमदार संतोष बांगर, जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी संजय दैने, पोलीस अधिक्षक जि. श्रीधर ,प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे व इतर अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते. सदर पुरस्कार पं.स. चा वतीने गट विकास अधिकारी प्रदिप बोंढारे, सहायक गटविकास अधिकारी आदिनाथ आंधळे, नोडल अधिकारी एस.पी. बेलुरे, ऑपरेटर गंगाधर शेळके, क.सहाय्यक शेकुराव सोनार, ग्रा.गृ. अभियंता एम.एफ. फारूखी, एम.एफ. आखीब, एम.ए. नाईक यांनी संयुक्त रित्या स्विकारण्यात आला. (प्रतिनिधी)



आखाडा बाळापूर - कळमनुरी पं.स.गटविकास अधिकारी प्रदिप बोंढारे यांना पुरस्कार प्रदान करताना पालकमंत्री अब्दुल सत्तार, खा.हेमत पाटील,आ.संतोष बांगर,पुरस्कार प्रदान करताना आ.संतोष बांगर

## ग्रामीण विकास मंत्रालयाने घेतली पालघरच्या आशियाना प्रकल्पाची दखल

### प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत बांधलेल्या घरांची तज्ज्ञांकडून पाहणी

**पालघर : पुढारी वृत्तसेवा**

वाडा तालुका येथे केंद्र सरकारच्या ग्रामीण विकासच्या समन्वयक सोनाक्षी वर्षानी व परमेश्वर शेलार (वास्तूविशारद राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण, बेलापूर नवी मुंबई) यांनी पंचायत समिती वाडा येथे भेट देऊन गटविकास अधिकारी यांच्यामार्फत माहिती घेऊन प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत बांधलेल्या आशियाना प्रकल्पाची पाहणी केली.

रोटरी ३१४१ यांच्या सहाय्याने आशियाना प्रकल्प हा संपूर्ण राज्यातून पालघर जिल्ह्यातील केवळ वाडा तालुक्यात राबवला जात आहे. आशियाना प्रकल्पामध्ये शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीमध्ये अतिरिक्त सहाय्य म्हणून रोटरी मार्फत ७० हजार रुपये दिले जातात. या घरांचा अभ्यास दौरा करण्याच्या हेतूने संबंधित अधिकाऱ्यांनी ही भेट दिली. यामध्ये महाराष्ट्रातील घरकुलांचे कामकाज गतिमान करणे तसेच घरकुलांची गुणवत्ता तपासणे या हेतूने हा दौरा करण्यात आला होता. यादरम्यान त्यानी आशियाना प्रकल्पातील घरांचे कौतुक केले.

यावेळी रोटरीचे पालघर जिल्हा सदस्य राज खोसला ह्यांनी पुढील येणाऱ्या लाभार्थ्यांच्या यादीवर काम करून अतिरिक्त मानधनात वाढ करून देण्याची चर्चा केली व वाडा पंचायत समिती घरकुल विभागाकडून नवीन प्रस्ताव देण्यास सांगितले. अपर्णा पाटील, विस्तार अधिकारी अधिकारी (सांख्यिकी) अपर्णा पाटील, तसेच जिल्हा प्रोग्रामर धनंजय पाटील, तालुका डेटा एन्ट्री ऑपरेटर भूषण वाघमारे तसेच ग्रामीण गृहनिर्माण अभियंता सौरभ पाटील, उज्वला धूम उपस्थित होते.



यावेळी अपर्णा पाटील, विस्तार अधिकारी अधिकारी अपर्णा पाटील, जिल्हा प्रोग्रामर धनंजय पाटील, भूषण वाघमारे तसेच ग्रामीण गृहनिर्माण अभियंता सौरभ पाटील, उज्वला धूम उपस्थित होते.





छत्रपती संभाजीनगर : विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांच्या हस्ते प्रशस्तिपत्रक स्वीकारताना विकास मीना, संगीतादेवी पाटील यांच्यासह ग्रामीण विकास यंत्रणेचे कर्मचारी.

## केंद्र, राज्य पुरस्कारात जिल्हा परिषद प्रथम

### महाआवास अभियानात छत्रपती संभाजीनगरचे उत्कृष्ट कार्य

छत्रपती संभाजीनगर, ता. १६ : जिल्हा परिषदेच्या ग्रामीण विकास यंत्रणेने २०२१-२२ मध्ये मराठवाड्यात महाआवास अभियानात उत्कृष्ट कार्य केल्याबाबत केंद्र आणि राज्य पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट जिल्हा परिषदमधून प्रथम क्रमांक पटकावला आहे. याबद्दल मंगळवारी (ता.१६) विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांच्या हस्ते जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

केंद्र आणि राज्य पुरस्कृत एकूण १८ पुरस्कारांमध्ये तब्बल नऊ पुरस्कार हे छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेने पटकावले आहेत. सर्वोत्कृष्ट पंचायत समितीमध्ये द्वितीय पुरस्कार पंचायत समिती- फुलंब्री, तृतीय पंचायत समिती- वैजापूर, सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत प्रथम- आंबा तांडा तालुका कन्नड, राज्य पुरस्कृत आवास योजनेत सर्वोत्कृष्ट जिल्हा परिषद प्रथम पुरस्कार जिल्हा परिषदेने मिळविला तर द्वितीय पंचायत समिती -पैठण, द्वितीय ग्रामपंचायत - दाभरूळ तालुका पैठण, तृतीय ग्रामपंचायत - जळकी तालुका सिल्लोड या ग्रामपंचायतीचा समावेश आहे. दरम्यान ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील यांनी गेल्या काही वर्षात प्रलंबित असलेल्या घरकुलांचा प्रश्न सोडवत काम पूर्ण करून घेण्यावर भर दिला आहे. तसेच केंद्रपुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व राज्य पुरस्कारात आवास योजनेची गतिमान पद्धतीने अंमलबजावणी, कामात गुणवत्ता वाढवण्यासाठी २० नोव्हेंबर २०२१ ते ५ जून २०२२ या कालावधीत जिल्हा व तालुकास्तरावरील कर्मचारी, क्षेत्रीय कर्मचाऱ्यांनी उत्कृष्टपणे काम केले आहे. यावेळी उपायुक्त उज्वला बावके, विस्तार अधिकारी सांख्यिकी नारायण डोंगरे, जिल्हा समन्वयक सुदेश रोकडे, राहुल वाघ, डाटा ऑपरेटर नीलेश राठोड उपस्थित होते.

## घरकुल का सपना होगा साकार

### 8 से 15 तक चलेगा आवास सप्ताह



घरकुल के लाभ के लिए पहल करें : ठाकरे

अपार्टमेंट निर्मिति को लेकर नियोजन करें : निकम

घरकुलों के काम पूर्ण करें : पंत

## घरकुल लाभार्थ्यांकरिता आता 'सेल्फी विथ होम'



**पुण्य नगरी / प्रतिनिधी**

**अमरावती :** जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ज्या लाभार्थ्यांना घरकुल मिळाले असून ते सध्या या घरात वास्तव्यात आहे. अशा लाभार्थ्यांना शासनाच्या विविध सोशल मीडियावर याचा आनंद साजरा करण्याकरिता समग्र आवास मोहीम सुरू करण्यात आली आहे. यामध्ये स्वतःचा घरासोबत सेल्फी काढून तो शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करावयाचा आहे. याची अंमलबजावणी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत करण्याचे आदेश शासनाकडून प्राप्त झाले आहे.

**'झेडपी'ला अंमलबजावणीचे आदेश**

जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत या दोन वर्षात ९८ हजार २९७ घरकुलांना मंजुरात देण्यात आली होती. यामध्ये ८४ हजार ८९ लाभार्थ्यांना पहिल्या टप्प्याचे अनुदान देण्यात आले. त्यानंतर ७५ हजार ९५९ लाभार्थ्यांना दुसरा टप्पा, ७२ हजार ७२६ ला तिसरा व घरकुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर ६० हजार ३५० लाभार्थ्यांना चौथा टप्प्यातील अनुदान वितरीत करण्यात आले आहे. यामध्ये ७१ हजार ८४ लाभार्थ्यांनी घरकुलाचे काम पूर्ण करून ते सर्व लाभार्थी या घरकुलामध्ये राहण्याकरिता देखील गेले आहेत. त्यांचा आनंद स्वतःच्या घरामुळे द्विगुणीत झाल्याने तो आनंद आता शासनासोबत साजरा करण्याकरिता समग्र आवास योजनेंतर्गत मोहीम राबविली जात आहे. सीईओ अविश्यांत पंडा यांच्या मार्गदर्शनाखाली सदरची मोहीम जिल्ह्यात राबविली जात असल्याची माहिती प्रकल्प संचालक प्रिती देशमुख यांनी दिली. त्यामुळे या लाभार्थ्यांना घरासोबत सेल्फी काढून शासनाच्या फेसबुक, ट्यूटर, याशिवाय शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करावयाचा आहे. सोबतच आपल्या आनंदाच्या क्षणाबाबत आपले मत प्रकट करावयाचे आहे. जिल्ह्यात याकरिता जनजागृती केली जात आहे.

## Complete pending works under housing scheme during *Awas* Week: CEO Pant

**District Correspondent**
WASHIM, May 6

*AWAS* Week is being implemented in Washim district from May 8 to May 15, 2023. During this week, the dream of poor to have their house will be fulfilled, informed ZP CEO Vasumna Pant.

Amrit Maha Awas Abhiyan 2022-23 was implemented from November 20, 2022 to March 31, 2023 in the State on the occasion of the *Amrut Mahotsava* year of the India's independence. The government has extended the campaign till June 5, 2023, to give people the benefit of this opportunity in Washim district. *Awas* Week has been organised to reach maximum number of beneficiaries. CEO Pant said that according to the Government policy of Housing for All-2024, all the systems have been instructed to distribute the installments to the houses approved under the Amrit Maha Awas Abhiyan in the district.



ZP CEO Vasumna Pant

Accordingly, she gave guidance and instructions regarding the effective implementation of the various rural housing schemes. Various activities are being implemented during the Awas Week in the district, she said.

As per the government's policy of Housing for All -2024 by implementing various activities during the campaign period, the Centrally sponsored Pradhan Mantri Awas Yojana, Rural as well as State sponsored Ramai Awas Yojana, Shabri Awas Yojana, Pardhi Awas Yojana and other schemes are being implemented in the district, it was informed.

ZP President Chandrkant Takre also said that Zilla Parishad and Panchyat Samiti-level officials should take the initiative to ensure that all the needy beneficiaries of the district get the benefit of Gharkuls during the Awas Week.

The beneficiaries of the village should complete ongoing and pending works on priority. All activities and proceedings under Awas Week should be completed during the period. All the systems under the District Rural Development System and at the Panchayat Samiti level are trying to make the *Amrit Maha Awas Abhiyan* by completing the housing works on priority basis during the period which is being implemented from May 8 to May 15, he said.

## पंतप्रधान आवास योजनेतील घरकूल पुर्ण झालेल्या ४५ लाभार्थ्यांचा गृहप्रवेश



देशोन्नती वृत्तसंकलन...

**हिमायतनगर** ■ प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा नांदेड यांच्या आदेशानुसार हिमायतनगर तालुक्यातील प्रधानमंत्री आवास योजनेतील एकुण ४५ लाभार्थीनी काम पूर्ण केले असून अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर गृह प्रवेश देखील केला आहे. सदर लाभार्थ्यांचे पंचायत समिती प्रशासनाकडून स्वागत करण्यात आले.

हिमायतनगर तालुक्यात पंतप्रधान आवास योजना व राज्य पुरस्कृत योजनेतून घरकुलांची कामे सुरू आहेत. लाभार्थ्यांच्या खात्यात पहिला हप्ता जमा झाल्यानंतर कामे सुरु करण्यासाठी विलंब लागला होता. सदरील लाभार्थ्यांना पंचायत समिती प्रशासनाने घरकुलांची कामे पूर्ण करण्यासाठी सुचना देत पुढाकार घेतला होता. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व इतर आवास योजनेंतर्गत पुर्ण झालेल्या घरकुलांचा गृहप्रवेश २२ एप्रिल रोजी तालुक्यात पंचायत समिती प्रशासनाकडून राबविण्यात आला.

तालुक्यात एकूण ४५ घरकुल लाभार्थ्यांनी अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर गृह प्रवेश केला आहे. गृह प्रवेश केलेल्या लाभार्थ्यांचे पंचायत समिती प्रशासनाने स्वागत केले आहे. यावेळी ग्राम पंचायत सरसम बु, दुधड वाळकेवाडीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य पंचायत समिती कार्यालयाचे ग्रामिण गृह निर्माण अभियंता वसंत सोनटक्के, लक्ष्मीकांत ओबरे, कनिष्ठ सहाय्यक ठमके यांची उपस्थिती होती.

## अमृत महाआवास सप्ताहासाठी १० संपर्कप्रमुखांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** अडकलेल्या वाशिम तालुक्यातील ७२३ घरकुल लाभार्थ्यांना अमृत महाआवास सप्ताहाचा प्रत्यक्ष लाभ व्हावा, यासाठी मुख्य कार्यपालन अधिकारी वसुमना पंत यांच्या मार्गदर्शनाखाली वाशिम तालुक्यात या अभिमानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी १० संपर्क प्रमुखांची निवड करण्यात आल्याची माहिती गटविकास अधिकारी प्रफुल्ल तोटावाड यांनी दिली.

जिल्हास्तरावरून ग्रामपंचायतमध्ये महाआवास सप्ताह साजरा केला जातो किंवा नाही याबाबत निरीक्षण पथकाची नेमणूक केलेली आहे. तरी पहिला हप्ता देऊन बांधकाम सुरू न केलेला लाभार्थी, भौतिकदृष्ट्या घरकुल पूर्ण झाले. परंतु अंतिम हप्ता दिलेल्या नाही असे लाभार्थी, दुसरा हप्ता देणे आवश्यक आहे अशी लाभार्थी, जागा उपलब्ध करून देणे अर्थसहाय्य योजनेचा प्रस्ताव सादर करणे, अपूर्ण घरकुल पूर्ण करणे, प्रस्तावामधील किरकोळ त्रुटी दूर करणे, नवीन प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करणे आदी कामे प्राधान्याने आपल्याला ग्रामपंचायतमध्ये करायची आहेत. याबाबतीत सर्व ग्रामसेवक सरपंच, पदाधिकारी, संपर्क अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंआ, शाखा अभियंता यांनी सक्रिय सहभाग घ्यावा सांगण्यात आले आहे. त्याबाबतचे प्रस्ताव त्वरित पंचायत समितीला सादर करावे व पंचायत समितीच्या घरकुल विभागाने आलेल्या प्रस्ताव त्वरित कार्यवाही पूर्ण करण्यासंदर्भात सूचना संबधितांना देण्यात आल्याचेही तोटावाड यांनी सांगितले.

## गरिबातील गरीब आणि वंचित घटकांना सुविधा पुरवून सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हेच ग्रामविकास विभागाचे उद्दिष्ट : चिलवंत

### बेंबळे तालुका माढा येथे पारधी समाजाच्या भगवान बिरसा मुंडा वसाहती मधील सात घरकुलांच्या पूर्ततेनिमित्त समारंभ

**दैनिक लोक सह्याद्री**

मिटकलवाडी बेंबळे/दत्तात्रय सुरवसे : बेंबळे येथे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या आणि विधीज्ञ एडवोकेट उषा पवार, कोकण विभागातील कृषी अधिकारी सयाजी इंगळे, पंचायत समितीचे ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे तालुका अभियान व्यवस्थापक अवधूत देशमुख, विस्तार अधिकारी भारत रेपाळ, आरेखक गोरे, गावच्या उपसरपंच नमिता अनपट, माजी सरपंच गोविंद भोसले, छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे संचालक यशवंत भोसले, गावच्या यात्रा कमिटीचे अध्यक्ष नारायण आबा काळे, ग्रामपंचायत सदस्य दीपक किर्ते, उत्तम काळे,नामदेव कांबळे, अनिता मस्के, माजी उपसरपंच नाना भोसले, ज्ञानोबा काळे, माजी सरपंच कल्पना भोसले, दीपक भोसले, कुर्डू गावचे सतीश भोसले, महेश पवार, निवास काळे, नीलम काळे, सोमनाथ काळे आदीसह बहुसंख्य ग्रामस्थ आणि घरकुल वासियांचे नातेवाईक उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना दीपक चिलवंत पुढे म्हणाले की, केंद्र शासनासह राज्याचा ग्रामविकास विभाग आणि सर्व स्थानिक स्वराज्य संस्था या तळागाळातील गोरगरिबांचे आणि वंचितांचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अहोरात्र कार्यरत असतात. किंबहुना हा आमचा मुख्य अजेंडाच आहे बेंबळे येथे हे क्रांतिकारक आणि ऐतिहासिक काम पूर्णत्वाकडे जाण्यासाठी बऱ्याच यंत्रणांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य केलेले आहे.यामध्ये विटा येथील गटविकास अधिकारी डॉ. संताजी पाटील यांच्या प्रयत्नांनी हा प्रकल्प पूर्णत्वाकडे गेलेला असेल तरी महसूल विभाग, ग्रामविकास विभाग, कृषी विभाग, समाज कल्याण विभाग, रोजगार हमी योजना विभाग आणि पाणीपुरवठा विभाग यांचे कृतीसंगम अतिशय सुंदर पद्धतीने या ठिकाणी जमिनीवर अवतरले आहे.

गेली चार वर्षांपासून पाठपुरावा करताना सर्व अधिकारी, कर्मचारी सह लोकप्रतिनिधी यांचे सहकार्य लाभलेले आहे. अनुसूचित जाती जमातीला आणि महिला वर्गाला सक्षम करणे, त्यांना रोजगारासाठी विविध शासकीय योजनेमधून मार्गदर्शन करणे आणि त्यांचे संपूर्ण कुटुंब समृद्धीकडे जाण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना शासकीय चौकटीत राहून यापुढेही चालू राहणार आहेत.

यासाठी शिक्षण, कौशल्य ,स्वयंरोजगार आणि समाज उपयोगी कामाची चतुसूत्री राबविण्यासाठी कुर्डूवाडी पंचायत समितीच्या संपूर्ण टीम सह कार्यरत राहणार आहे.

याप्रसंगी ऍड. उषा पवार यांनी उपस्थित ग्रामस्थ, लाभार्थी आणि



पंचायत समितीचे सर्व कर्मचारी यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामविकास अधिकारी मधुकर माने यांनी केले तर आभार प्रदर्शन बापू काळे यांनी केले.

## भोकर पंचायत समितीला विभागीय पातळीवरील प्रथम पुरस्कार

देशोन्नती वृत्तसंकलन...

### १६ मे रोजी होणार विभागीय आयुक्त कार्यालयात पुरस्कार प्रदान

**भोकर** ■ केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांची अंमलबजावणी गतिमान करणे व त्यामध्ये गुणवत्ता आणण्यासाठी यशस्वी अंमलबजावणी करून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्था व व्यक्तींना पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. भोकर पंचायत समितीला हा पुरस्कार मिळाला असून विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद येथे १६ मे रोजी या पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

ग्रामीण घरकुल योजनांची योग्य अंमलबजावणी करून उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्थांना हा पुरस्कार दिला जातो. २० नोव्हेंबर २०२१ ते ५ जून २०२२ या कालावधीत काम करणाऱ्या संस्थांचे मूल्यांकन करून हा पुरस्कार देण्यात येतो. भोकर पंचायत समिती मार्फत शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार महा आवास अभियान ग्रामीण अंतर्गत उत्कृष्ट काम करण्यात आले. गटविकास अधिकारी अमित राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विस्तार अधिकारी, ग्रामसेवक, कर्मचारी यांनी विशेष काम केल्यामुळे हा पुरस्कार प्राप्त झाला असून १६ मे रोजी विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद येथे सकाळी ११ वाजता गटविकास अधिकारी अमित राठोड यांना पुरस्कार वितरित करण्यात येणार आहे. औरंगाबाद विभागीय आयुक्त कार्यालयांतर्गत पंचायत समितीला हा प्रथम पुरस्कार आहे, हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल गटविकास अधिकारी राठोड यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## अपूर्ण घरकुल असलेल्या लाभार्थ्यांची शिबिरे घ्या

पुणे, दि. २५ (प्रतिनिधी) - पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण क्षेत्रांमध्ये घरकुलांसाठी जागेच्या अभावी उद्दिष्ट पूर्ण होऊ शकलेले नाही. या एकमेव कारणामुळे घरकुल अपूर्ण राहिलेल्या लाभार्थ्यांसाठी त्यासाठी जिल्हा परिषदेने अपूर्ण घरांसाठी शिबिरे घेऊन मार्गदर्शन करण्याच्या सूचना तालुका पंचायत समितींना देण्यात आल्या आहेत.

**झेडपीचे आदेश**

ग्रामीण भागामध्ये बेघर नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना आणि शबरी आवास योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या घरांपैकी अद्यापपर्यंत सुरू नसलेली किंवा प्रगतीवर असलेल्या लाभार्थ्यांचा मेळावा घेण्यात येणार आहे. शिबिरामध्ये लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार असून, त्याशिवाय घरकुलाचा पहिला हप्ता वितरीत करण्यात येणार आहे.

जे लाभार्थी घरकुल बांधकाम करण्यास इच्छुक नाही, त्यांचे अनुदान पुन्हा वर्ग करण्यात येणार आहे. जे लाभार्थी अनुदान परत करणार नाहीत, त्यांच्यावर कारवाई केली जाईल. यामध्ये सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांचा समावेश करून घेण्यात येणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त घरे पूर्ण होऊन उद्दिष्ट साध्य होण्यास मदत होण्यावर भर दिला जाणार आहे.

## खुल्लोड येथे गटविकास अधिकाऱ्यांनी केली घरकुलांची पाहणी



## घरकुल बांधलं सेल्फी काढा अन् जिल्हा परिषदेला सांगा

### सेल्फी विथ होम : निवारा मिळाल्याचा आनंद होणार द्विगुणित

झेडपीच्या वेबसाईटवर टाका छायाचित्र

## मेंढला खु.येथे अक्षय तृतीयाच्या शुभमुहूर्तावर प्रधानमंत्री आवास योजनेच्या घरकुलाचे लोकार्पण

### सरपंच प्र.दत्ता पाटील नवले यांच्याहस्ते फित कापून लोकार्पण

अर्धापूर/गुणवंत विरकर

तालुक्यातील मेंढला खु.येथे प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास योजने अंतर्गत बांधलेल्या घरकुलाचे लोकार्पण अक्षय तृतीया,महात्मा बसवेश्वर महाराज जयंती, छत्रपती शिवाजी महाराज, भगवान परशुराम जयती व रमजान ईदच्या शुभमुहूर्तावर मेंढला खु.चे सरपंच प्रतिनिधी दत्ता पाटील नवले यांच्या हस्ते फित कापून लोकार्पण करण्यात आले.

ग्रामपंचायत मेंढला खुर्द येते पंचायत समिती अर्धापूर अंतर्गत प्रधानमंत्री आवास



योजना व रमाई आवास योजना ग्रामीण घरकुलाचे गृहप्रवेशाचा कार्यक्रम अक्षय तृतीयाच्या शुभमुहूर्तावर संपन्न झाला.यावेळी सरपंच प्रतिनिधी दत्ता पाटील नवले,पंचायत समितीचे घरकुल अभियंता भंडारे, ग्रामसेविका राठोड मॅडम, घरकुल लाभार्थी, गांवातील नागरिक गजानन पहेलवान, विठ्ठल वानखेडे, दिगंबर लढे, प्रभाकर वानखेडे, ज्ञानेशवर् वानखेडे,

विठ्ठल राऊत, माधव नवले,अविनाश लढे,उत्तमराव नवले, त्रिमुखू वानखेडे संदीप नवले,संतोष जाधव,माधव वानखेडे पाटील यांच्यासह गांवातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत दोन दिवसीय पश्चिम भारत प्रादेशिक कार्यशाळे प्रसंगी मार्गदर्शन करतांना मा. महानिदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार श्री.गया प्रसाद




प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत दोन दिवसीय पश्चिम भारत प्रादेशिक कार्यशाळे प्रसंगी मार्गदर्शन करतांना मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले




प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत दोन दिवसीय पश्चिम भारत प्रादेशिक कार्यशाळे प्रसंगी मार्गदर्शन करतांना मा.उपसचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार श्री.शक्तीकांत सिंह




प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत दोन दिवसीय पश्चिम भारत प्रादेशिक कार्यशाळे प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे सादरीकरण करतांना संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण डॉ.राजाराम दिघे

## “महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास,
## २०२४ पर्यंत सर्वांसाठी आवास”




## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
दुरध्वनी क्र. - ०२२ - २७५६१८२४, महा आवास हेल्पलाईन क्रमांक - १८०० २२ ०१९
ई-मेल - directoriayruralhousing@gmail.com, वेबसाईट - www.mahaawaas.org